cmyk

## संपादकीय

### लोकशाहीचा पाया मजबूत ठेवण्याची खरी कसोटी

भारतीय लोकशाहीचा सर्वात मोठा उत्सव म्हणजे निवडणूक. जगातील सर्वात मोठ्या लोकशाही व्यवस्थेचा अभिमान मिरवणाऱ्या भारतासाठी निवडणूक ही केवळ राजकीय सत्ता बदलण्याची प्रक्रिया नसून जनतेच्या सार्वभौम अधिकाराची प्रत्यक्ष अभिव्यक्ती आहे. मतपेटीतून उमटणारा प्रत्येक मताचा ठसा हा नागरिकाच्या विश्वासाचा, संविधानावरील श्रद्धेचा आणि लोकशाही व्यवस्थेतील सहभागाचा पुरावा असतो. म्हणूनच निवडणूक प्रक्रिया केवळ पारदर्शक असून चालत नाही


दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

• छत्रपती संभाजीनगर • पुणे • अहिल्यानगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–७० | शनिवार दि.३० मे २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


## थोडक्यात...

### नेत्यांचे पगार कमी करा–बागेश्वर बाबा

भोपाळ : बागेश्वर बाबा सोशल मीडियावर नेहमी चर्चेत असतात. ते पुन्हा एकदा एका विधानामुळे चर्चेत आले आहेत. यामध्ये त्यांनी इंधनावरून नेत्यांना सल्ला दिला आहे. हा व्हीडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. या व्हीडीओमध्ये, ते एका कार्यक्रमादरम्यान देशाची आर्थिक परिस्थिती, इंधनाचा वापर आणि राजकारण्यांच्या खर्चावर स्पष्ट भाष्य करताना दिसत आहेत. या कार्यक्रमादरम्यान बागेश्वर बाबा म्हणाले की, जेव्हा जेव्हा पेट्रोल आणि डिझेल वाचवण्याचा किंवा संसाधनांचे संवर्धन करण्याचा विषय येतो, तेव्हा सर्वसामान्य जनतेला त्याग आणि बचत करण्याचे आवाहन केले जाते. राजकारण्यांकडून वापरल्या जाणाऱ्या चार्टर्ड विमानांना सर्वाधिक इंधन लागत असूनही, त्यांच्यावर बंदी घालण्याबाबत चर्चा का होत नाही, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

### जमिनीच्या वादातून सहा जणांना संपवले

विजापूर : कर्नाटकातील विजापूर जिल्ह्यात धक्कादायक घटना घडली आहे. जिल्ह्यातील गोविंदपूर येथे गोळीबाराची घटना घडली आहे. यामध्ये सहा जणांची हत्या झाल्याचे समोर आले आहे. ही हत्या जमिनीच्या वादातून झाल्याचे सांगण्यात आले. एकाच वेळी सहा जणांची हत्या झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. या प्रकरणी अधिकचा तपास सुरु करण्यात आला आहे. शुक्रवारी सायंकाळी घडलेल्या भीषण घटनेत सहाजणांची गोळ्या झाडून हत्या करण्यात आल्याने संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

### शिक्षक भरती प्रक्रियेला मुदतवाढ

पुणेः शिक्षक भरती प्रक्रियेला नवीन गती देण्यासाठी राज्य शासनाने पवित्र पोर्टलवर शिक्षकांच्या रिक्तपदांची जाहिरात नोंदविण्यासाठी ३१ मेपर्यंत मुदत देण्यात आली होती. परंतु, त्याला मुदतवाढ देण्यात आली असून, बिंदुनामावली तपासणी पूर्ण करण्यासाठी १५ जून २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांनी याबाबत स्पष्ट निर्देश दिले आहेत. राज्यातील अनेक शाळा आणि संस्थांमध्ये प्रशासकीय प्रक्रिया, बिंदुनामावली पडताळणी, संचमान्यता आणि इतर औपचारिकता अद्याप अपूर्ण असल्याने संस्थाचालकांनी शिक्षण विभागाकडे मुदतवाढीची मागणी केली होती. या मागण्या स्वीकारून विभागाने जास्तीत जास्त संस्थांना प्रक्रियेत सामावून घेण्याचा निर्णय घेतला आहे. नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वी शाळांमध्ये शिक्षकांची पदे रिक्त राहिल्यास विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर थेट विपरीत परिणाम होऊ शकतो.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२९ मे २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| गहू: १५७.५० क्विंटल | | |
| १,९५० | ३,२३२ | २,३४७ |
| ज्वारी/हायब्रिड: १८४.०० क्विंटल | | |
| २,०४० | ४,०११ | २,७१९ |
| मका/लोकल:८.५० क्विंटल | | |
| १,७०० | १,९७० | १,८३५ |
| तूर : १०.५० क्विंटल | | |
| ७,४११ | ७,४१७ | ७,४१४ |
| उडीद : -- क्विंटल | | |
| -- | -- | -- |
| बाजरी: ११४.०० क्विंटल | | |
| १,७७० | २,६४१ | २,२५६ |
| मुग: -- क्विंटल | | |
| -- | -- | -- |
| सोयाबीन:-- क्विंटल | | |
| -- | -- | -- |
| हरभरा: १३.०० क्विंटल | | |
| ५,५२० | ५,७८० | ५,६५० |

# खरीप हंगामावर संकटाचे ढग!

## हवामान विभागाकडून कमी पावसाचा इशारा; महाराष्ट्रावर दुष्काळाचे सावट?

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**भारतीय हवामान विभागाने शुक्रवारी (दि.२९) नैऋत्य मान्सून २०२६ संदर्भातील दुसऱ्या टप्प्याचा दीर्घकालीन अंदाज जाहीर केला असून, महाराष्ट्रासाठी चिंताजनक चित्र समोर आले आहे. यंदाच्या मान्सून हंगामात राज्यात सामान्यपेक्षा कमी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्यामुळे खरीप हंगाम, पाणीटंचाई आणि उष्णतेच्या समस्यांबाबत चिंता वाढली आहे.**



हवामान खात्याच्या अंदाजानुसार देशभरात जून ते सप्टेंबर २०२६ या कालावधीत दीर्घकालीन सरासरीच्या केवळ ९० टक्के पाऊस पडण्याची शक्यता आहे. हे प्रमाण सामान्यपेक्षा कमी मानले जाते. महाराष्ट्राचा समावेश मध्य भारत आणि दक्षिण द्वीपकल्प या दोन्ही हवामान विभागांत होत असल्याने राज्यावर दुहेरी परिणाम होण्याची शक्यता आहे. मध्य भारतात ४३ टक्के तर दक्षिण द्वीपकल्पात ४५ टक्के कमी पावसाची शक्यता ने व्यक्त केली आहे. महाराष्ट्रातील विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील मोठा भाग मान्सून कोअर झोन मध्ये येतो. हा भाग कोरडवाहू शेतीसाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. मात्र, याच झोनमध्ये सामान्यपेक्षा कमी पावसाची ४३ टक्के शक्यता वर्तवण्यात आल्याने खरीप हंगाम धोक्यात येण्याची भीती व्यक्त होत आहे. विशेषतः सोयाबीन, कापूस, तूर आणि मका उत्पादक शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. जून महिन्यातही देशभरात सरासरीच्या ९२ टक्क्यांपेक्षा कमी पाऊस ▶▶ पान २ वर

> **राज्य सरकारे आणि जिल्हा प्रशासनांना उपाययोजना करण्याचे आवाहन**
>
> पाणी साठा आणि संवर्धनाच्या उपाययोजना राबवाव्यात. शेतीसाठी आपत्कालीन नियोजन करावे. उष्माघाताच्या दृष्टीने थंड निवारा केंद्रे सुरू ठेवावीत. पिण्याच्या पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करावी. आरोग्य यंत्रणा सज्ज ठेवावी.

# नोंदी सापडलेल्या ५८ लाख मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र द्या–मनोज जरांगे

## मराठ्यांसाठी वेगळे मंत्रालय स्थापन करा; आंदोलनावर ठाम

जालना । प्रतिनिधी

**राज्य सरकार म्हणतेय कुणबीच्या ५८ लाख नोंदी सापडल्या, मग त्या जाहीर करा, त्या सर्वांना कुणबी प्रमाणपत्र द्या, अशी मागणी मनोज जरांगे यांनी केली. मराठ्यांसाठी स्वतंत्र मंत्रालय स्थापन करा, हैदराबाद गॅझेटप्रमाणे सातारा गॅझेटचा जीआर काढा, मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देणार हे लेखी द्या, अशी मागणीही यावेळी मनोज जरांगे यांनी केली. मराठा समाजासाठी तुम्हाला जेवढे शक्य आहे तेवढे करा, आधीच्या राज्यकर्त्यांनी मराठ्यांसाठी काही केले नाही, म्हणून तुम्हाला सत्तेत आणले, असे सांगत मी आंदोलन करणारच असा इशाराही त्यांनी दिला.**



मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे हे ३० मे पासून अंतरावाली सराटीमध्ये आंदोलन करणार आहेत. त्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारच्या शिष्टमंडळाने त्यांची भेट घेतली आणि आरक्षणाच्या मागणीवर चर्चा केली. या शिष्टमंडळात मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि आमदार प्रसाद लाड होते. शिष्टमंडळासोबत चर्चा करताना मनोज जरांगे म्हणाले की, राज्य सरकारने या आधी हैदराबाद गॅझेटचा जीआर काढला, पण सातारा गॅझेटचा जीआर अद्याप काढला नाही. सरकारने कुणबीच्या ५८ लाख नोंदी सापडल्याचे सांगितले होते, ▶▶ पान २ वर

# पुण्यात विषारी दारूचे १३ बळी

## सख्ख्या भावांनी गमावला जीव, वडिलांनी डोळे गमावले

पिंपरी । प्रतिनिधी

**पुण्यासह पिंपरी–चिंचवडमध्ये विषारी दारूमुळे सुरू झालेले मृत्यूचे तांडव थांबत नसून सारे शहरच हादरून गेले आहे. एकामागून एक सुरू झालेल्या मृत्यूसत्रामुळे परिसरात शोककळा पसरली. यात १३ जणांचा बळी गेला असून, मृताची संख्या वाढण्याची शक्यता आहे.**

आनंदवन, काटेवस्ती, संजयनगर, आझाद चौक आणि जय महाराष्ट्र चौक या परिसरावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. अनेकांचे संसार उद्ध्वस्त झाले असून, परिसरात भीतीचे वातावरण आहे. तर विषारी दारूमुळे एकाच घरातील दोन सख्ख्या भावांचा मृत्यू झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, विषारी दारुमुळे पिंपरी चिंचवडच्या फुगेवाडीतील विजय राठोड आणि विजु राठोड या दोन सख्ख्या भावांचा मृत्यू झाला तर त्यांचे वडील प्रकाश यांची देखील दृष्टी नाहीशी झाली आहे. त्यांनाही उपचारांसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. विजय आणि राजू राठोड हे दोघांचीही मुले लहान ▶▶ पान २ वर

# केजमध्ये काळीज पिळवटून टाकणारी घटना!

## खा. श्रीकांत शिंदे यांच्याकडे मदतीचे निवेदन देण्यापूर्वीच वृद्धाचा मृत्यू

बीड । प्रतिनिधी

**शिवसेना नेते खासदार श्रीकांत शिंदे यांना निवेदन देण्यासाठी आलेल्या ६८ वर्षीय वृद्धाचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाल्याची केज येथे घडली. रसूल गफूर सय्यद असे वृद्धाचे नाव आहे.**

रसूल गफूर सय्यद यांच्या मुलाचा पाण्यात बुडून मृत्यू झाला होता, त्या संदर्भात काही मदत मिळावी यासाठी खासदार श्रीकांत शिंदे यांची भेट घेण्यासाठी रसूल सय्यद हे कुटुंबातील सदस्यासह कार्यक्रमाच्या ठिकाणी आले होते. याठिकाणी मोठ्या प्रमाणात गर्दी शिवाय उष्णता यामुळे त्यांना श्वास घ्यायला त्रास झाला आणि गुदमरल्यासारखे झाले. यावेळी त्यांना लगेच हॉस्पिटलमध्ये दाखल केले मात्र त्यांचा मृत्यू झाला. त्यांचा मुलगा पाशा सय्यद यांनी ही माहिती दिली. हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने त्यांचा मृत्यू झाला असे डॉ.बालासाहेब अस्वले यांनी सांगितले. खासदार श्रीकांत शिंदे यांनी सय्यद कुटुंबीयांची भेट घेत सांत्वन केले. यावेळी मंत्री भरत गोगावले देखील उपस्थित होते. यावेळी पाच लाख रुपयांची आर्थिक मदत कुटुंबीयांना सुपूर्द करण्यात आली. १० मे ला त्यांचा ▶▶ पान २ वर



# मावशीकडे आलेल्या दोन चिमुकल्याचा अंगावर भिंत पडून मृत्यू

जालना (प्रतिनिधी)

अंबड तालुक्यातील घुंगर्डे हादगाव येथे शुक्रवारी दुपारी घराजवळ खेळत असताना अंगावर भिंत पडून दोन मुलाचा मृत्यू झाला. या घडलेल्या हृदयद्रावक घटनेमुळे गावात हळहळ व्यक्त होत असून, दोन्ही कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.


मिळालेल्या माहितीनुसार, शौर्य गोरख कासार (वय ९, रा. घुंगर्डे हादगाव) आणि चैतन्य राधाकिसन भिसे (वय ११, रा. मारफळ, ता. गेवराई, जि. बीड) हे दोघे मावस भाऊ शुक्रवारी दुपारी कृष्णा भिमराव थोरात यांच्या घराशेजारी खेळत होते. त्यावेळी शेजारी असलेल्या विलास रामभाऊ गायकवाड ▶▶ पान २ वर



# कार्यालयात खेटा मारणं बंद, अवघ्या १४ दिवसांत जमिनीची मोजणी

पुणे । प्रतिनिधी

भूमी अभिलेख विभागाने पोटहिस्सा मोजणीचा क्रांतिकारी निर्णय घेतल्यानंतर आता कमी दिवसांत मोजणी करण्याची मोहीम हाती घेतली आहे. प्रलंबित मोजण्यांची संख्या कमी करण्यासाठी; तसेच तातडीने जमीन मालकांना त्यांच्या जमिनीच्या मोजणीचा कालावधी कमी करून देण्यासाठी 'द्रुतगती' मोजणी आता केवळ १४; तर नियमित मोजणी २८ दिवसांत करून देण्याचा निर्णय भूमी अभिलेख विभागाने घेतला आहे. राज्यातील ▶▶ पान २ वर



# विधानपरिषदेच्या तीन जागांवरून महायुतीत संघर्ष

## महाविकास आघाडीतही नाशिकच्या जागेवरून चर्चा

मुंबई । प्रतिनिधी

विधान परिषदेच्या नाशिक स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघासाठीची निवडणूक प्रक्रिया सुरू होऊन तीन दिवस लोटले तरी, महायुती आणि महाविकास आघाडीचे जागावाटप ठरत नसल्याने इच्छुकांची चलबिचल वाढली आहे. तर नाशिक आणि संभाजीनगरपैकी एक जागा भाजपला हवी आहे. त्यामुळे हा वाद जागेवरून महायुतीचे घोडे अडले असून, हा वाद थेट केंद्रीय गृहमंत्री अमित शहांपर्यंत पोहोचला आहे.

शिवसेना

महायुती

महाविकास आघाडीतही नाशिकची जागा शिवसेना 'उबाठा'ने लढावी की, राष्ट्रवादी काँग्रेस ▶▶ पान २ वर

# पेपरफुटी प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने एनटीएला फटकारले

## • इतर संस्थांचा आदर्श घेण्याचा दिला सल्ला




नवी दिल्ली । वृत्तसंस्था

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षांमध्ये कधीही पेपर लीक झाला नसल्याचे सांगत, सर्वोच्च न्यायालयाने यंत्रणा अपयशी ठरल्यास जबाबदारी निश्चित करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट केले आणि नीट–युजी पेपर लीक प्रकरणावरून राष्ट्रीय परीक्षा संस्थेला ( एनटीए) चांगलेच फटकारले. सर्वोच्च न्यायालयाने ▶▶ पान २ वर

> **परिक्षा प्रक्रिया अधिक पारदर्शक केली**
>
> प्रश्नपत्रिका तयार करण्याच्या प्रक्रियेत समस्या होती. आता पेपर सेटिंगची प्रक्रिया अधिक मजबूत केली जात आहे. परीक्षा पद्धतीत फेनोमेनल इम्प्रूव्हमेंट (कमालीची सुधारणा) झाली असून, सुरक्षित परीक्षा अंमलबजावणीची नवीन चौकट सुरू करण्यात आली आहे, असे निट ने स्थापन केलेल्या समितीने नमूद केले. ओळखण्यात आलेल्या त्रुटी दूर करण्यात आल्या असून, आगामी पुनर्रचनेत अशी घटना पुन्हा घडणार नाही, अशी ग्वाही डॉ. राधाकृष्णन यांनी खंडपीठाला दिली.

> **शिक्षण मंत्रालयाला प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश**
>
> सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला नीट पेपर लीक प्रकरणावर सविस्तर प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचे निर्देश दिले. न्यायालयाने विशेषतः शिक्षण मंत्रालयाला दरवर्षी सुरक्षित आणि उत्तरदायी पद्धतीने परीक्षा कशा आयोजित केल्या जातील, याचे स्पष्टीकरण देण्यास सांगितले आहे. तसेच, संस्थात्मक स्मृती, विशेष कौशल्य, क्षेत्र तज्ज्ञांची नेमणूक आणि दीर्घकालीन परीक्षा व्यवस्थापन प्रणाली कशी स्थापित केली जाईल, हे दर्शवण्यासही मंत्रालयाला सांगण्यात आले आहे. यापूर्वी आरोग्य मंत्रालयाला नोटीस पाठवण्यात आली होती, मात्र आता शिक्षण मंत्रालय या चिंतांचे निवारण करण्यासाठी जबाबदार असेल, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

# कॉक्रोच पार्टीचे खाते ब्लॉकच राहणार

## हायकोर्टाचा अभिजीत दिपकेंना दिलासा नाही




नवी दिल्ली । वृत्तसंस्था

कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजित दीपके यांनी एक्स कडून त्यांचे अकाउंट ब्लॉक केले गेल्याच्या विरोधात दिल्ली उच्च न्यायालयात धाव घेतली होती. शुक्रवारी (दि. २९) उच्च न्यायालयाने कॉकरोच जनता पार्टी चे सोशल मीडिया हँडल (पूर्वीचे ट्विटर) अकाउंट तातडीने पूर्ववत करण्याचे निर्देश देण्यास नकार दिला आहे. तसेच न्यायमूर्ती पुरुषेंद्र ▶▶ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# लोकशाहीचा पाया मजबूत ठेवण्याची खरी कसोटी

भारतीय लोकशाहीचा सर्वात मोठा उत्सव म्हणजे निवडणूक. जगातील सर्वात मोठ्या लोकशाही व्यवस्थेचा अभिमान मिरवणाऱ्या भारतासाठी निवडणूक ही केवळ राजकीय सत्ता बदलण्याची प्रक्रिया नसून जनतेच्या सार्वभौम अधिकाराची प्रत्यक्ष अभिव्यक्ती आहे. मतपेटीतून उमटणारा प्रत्येक मताचा ठसा हा नागरिकाच्या विश्वासाचा, संविधानावरील श्रद्धेचा आणि लोकशाही व्यवस्थेतील सहभागाचा पुरावा असतो. म्हणूनच निवडणूक प्रक्रिया केवळ पारदर्शक असून चालत नाही, तर ती निष्पक्ष, निर्दोष, अचूक आणि सर्वसमावेशक असणे अत्यावश्यक ठरते. या संपूर्ण व्यवस्थेचा मूलाधार म्हणजे मतदार यादी. मतदार यादीतच त्रुटी असतील, पात्र मतदारांची नावे वगळली जात असतील किंवा अपात्रांची नावे टिकून राहत असतील, तर संपूर्ण लोकशाही प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उभे राहते. म्हणूनच निवडणूक आयोगाने हाती घेतलेल्या विशेष सखोल पुनरीक्षण अर्थात एसआयआर प्रक्रियेला सर्वोच्च न्यायालयाने वैध ठरवले, हा निर्णय केवळ कायदेशीर नाही तर व्यापक लोकशाही व्यवस्थेशी निगडित आहे.

सर्वोच्च न्यायालयाने या प्रक्रियेविरोधातील १९ याचिका फेटाळताना संविधानाच्या अनुच्छेद ३२४ अंतर्गत निवडणूक आयोगाच्या स्वायत्त अधिकारांवर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब केले आहे. निवडणूक आयोगाला मतदार यादीचे पुनरीक्षण, शुद्धीकरण आणि निवडणूक व्यवस्थापनासाठी व्यापक अधिकार आहेत, हे न्यायालयाने स्पष्ट केले. या निर्णयामुळे देशातील विविध राज्यांमध्ये सुरू असलेल्या मतदार यादी शुद्धीकरण मोहिमेला कायदेशीर आधार मिळाला आहे. बोगस मतदारांची नावे हटवणे, दुबार नोंदी शोधून काढणे, मृत व्यक्तींची नावे वगळणे आणि नव्या मतदारांची नोंदणी करणे ही कोणत्याही सुदृढ लोकशाहीसाठी अपरिहार्य बाब आहे. विशेषतः ग्रामीण भागात आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये काही मतांच्या फरकाने सत्ता बदलते. त्यामुळे मतदार यादीतील प्रत्येक नावाचे महत्त्व मोठे असते. परंतु, निवडणूक प्रक्रिया ही फक्त तांत्रिक किंवा प्रशासकीय प्रक्रिया नसते. ती लोकांच्या विश्वासावर उभी असते. न्यायालयाने आयोगाच्या अधिकारांना मान्यता दिली असली, तरी आयोगावरील जनतेचा विश्वास टिकवणे ही अधिक मोठी जबाबदारी आहे. गेल्या काही वर्षांत निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर वारंवार प्रश्न उपस्थित झाले आहेत. विरोधी पक्षांकडून आयोगावर पक्षपातीपणाचे आरोप झाले, तर राजकीय विश्लेषकांनीही आयोगाच्या तटस्थतेवर चिंता व्यक्त केली. काही निवडणुकांमध्ये सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांच्या आचारसंहिताभंगाकडे दुर्लक्ष करण्यात आले, असा आरोप झाला; तर विरोधी पक्षांच्या किरकोळ उल्लंघनांवर तातडीने कारवाई करण्यात आल्याची उदाहरणे पुढे आली. त्यामुळे निवडणूक आयोग ही संविधानिक संस्था स्वतंत्रपणे काम करते की सत्तेच्या दबावाखाली, असा प्रश्न सामान्य नागरिकांच्या मनात निर्माण होणे स्वाभाविक आहे. लोकशाहीतील कोणतीही संस्था केवळ संविधानिक दर्जामुळे महान ठरत नाही; तिचे वर्तन, निर्णयप्रक्रिया आणि सार्वजनिक विश्वास हेच तिच्या प्रतिष्ठेचे खरे मोजमाप असते. निवडणूक आयोगाच्या बाबतीत ही बाब अधिक संवेदनशील ठरते, कारण तो थेट लोकशाहीच्या शुद्धतेशी संबंधित आहे. जर मतदार यादी पुनरीक्षणाच्या नावाखाली एखाद्या विशिष्ट मतदारवर्गाची नावे हटवली गेली, तर ते लोकशाहीचे शुद्धीकरण नसून तिचे विकृतीकरण ठरेल. विरोधकांनी व्यक्त केलेली ही भीती पूर्णपणे निराधार मानता येणार नाही. देशात पूर्वी अनेक वेळा मतदार यादीत मोठ्या प्रमाणात त्रुटी आढळल्या आहेत. काही भागांत जिवंत व्यक्तींची नावे गायब झाली, तर काही ठिकाणी एकाच व्यक्तीची नावे अनेक ठिकाणी नोंदली गेली. त्यामुळे मतदार यादी शुद्धीकरण ही प्रक्रिया जितकी आवश्यक आहे, तितकीच ती पारदर्शक आणि विश्वासार्ह असणेही महत्त्वाचे आहे. आज डिजिटल तंत्रज्ञानामुळे निवडणूक प्रक्रिया अधिक वेगवान आणि संगणकीकृत झाली आहे. आधार, डिजिटल नोंदणी, ऑनलाइन पडताळणी यांसारख्या सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डेटा ॲनालिटिक्सचा वापर करून बोगस नावे शोधणे सोपे झाले आहे. परंतु तंत्रज्ञान जितके उपयुक्त, तितकेच धोकादायकही ठरू शकते. चुकीचा डेटा, अपुरी पडताळणी किंवा हेतुपुरस्सर हस्तक्षेप यामुळे मोठ्या प्रमाणावर नागरिकांचे मतदानाचे अधिकार धोक्यात येऊ शकतात. त्यामुळे तंत्रज्ञानाचा वापर करताना पारदर्शकता, जबाबदारी आणि सार्वजनिक पडताळणी यंत्रणा आवश्यक आहे. मतदार यादीतील बदलांबाबत नागरिकांना वेळेत माहिती मिळाली पाहिजे, आक्षेप नोंदवण्याची सोपी व्यवस्था असली पाहिजे आणि आयोगाने त्यावर निष्पक्ष सुनावणी दिली पाहिजे. याहूनही महत्त्वाचे म्हणजे निवडणूक आयोगाने आपल्या प्रतिमेबाबत गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. सर्वोच्च न्यायालयाने दिलेले कायदेशीर संरक्षण हे आयोगासाठी ''अभेद्य कवच'' असू शकते; पण त्याचा वापर ''राजकीय संरक्षण'' म्हणून होऊ लागला, तर लोकशाहीला मोठा धोका निर्माण होईल. आयोगाने प्रत्येक निर्णयात समान निकष वापरले पाहिजेत. सत्ताधारी पक्ष असो किंवा विरोधक, नियम सर्वांसाठी सारखे असले पाहिजेत. कारण लोकशाहीतील विश्वास एकदा ढासळला, तर तो पुन्हा निर्माण करणे अत्यंत कठीण असते. भारतीय लोकशाहीसमोर आज केवळ निवडणुका घेण्याचे आव्हान नाही, तर त्या निष्पक्ष असल्याचा जनतेला विश्वास देण्याचेही मोठे आव्हान आहे. निवडणूक आयोग, न्यायपालिका आणि प्रशासन या तिन्ही यंत्रणांनी या विश्वासाचे रक्षण केले पाहिजे. देशातील एकाही पात्र नागरिकाचा मतदानाचा हक्क हिरावला जाऊ नये आणि एकाही अपात्र व्यक्तीला मतदानाचा अधिकार मिळू नये, हा समतोल साधणे हेच खरी लोकशाहीची कसोटी आहे. लोकशाही ही फक्त मतदानाची यंत्रणा नसते; ती जनविश्वासाची रचना असते. त्या रचनेतील प्रत्येक वीट मजबूत असली पाहिजे. मतदार यादी ही त्या रचनेचा पाया आहे आणि निवडणूक आयोग हा त्या पायाचा प्रमुख संरक्षक आहे. सर्वोच्च न्यायालयाने आयोगाच्या अधिकारांना मान्यता दिली आहे; आता आयोगाने आपल्या वर्तनातून त्या विश्वासाला पात्र ठरण्याची वेळ आली आहे. कारण अखेरीस, निर्दोष मतदार यादी, निष्पक्ष निवडणूक प्रक्रिया आणि भयमुक्त मतदान हेच सशक्त, निरोगी आणि टिकाऊ लोकशाहीचे खरे गमक आहे.

# शिवसैनिकांनो जिंकण्याच्या शर्यतीत उतरा, तुम्हाला जिंकवण्याची जबाबदारी पक्षाची-खा.डॉ.श्रीकांत शिंदे

## बीड-माजलगाव मतदारसंघातील शिवसंवाद दौऱ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद!

बीड । प्रतिनिधी

**महाराष्ट्रासह मराठवाड्यात उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे साहेबांच्या कामाची सकारात्मक प्रतिमा निर्माण झालेली आहे. बीड जिल्ह्यात शिवसेनेला आगामी काळात मोठी संधी आहे. लोकांच्या मनात आजही शिवसेना आहे. त्यामुळे तळागाळात जाऊन काम करा, स्वत:ची ताकद निर्माण करा. आपण मागणारे नाही तर देणारे आहोत. ज्याच्याकडे ताकद आहे, त्याला पक्ष नक्की ताकद देतो. शिवसैनिकांनो, जिंकण्याच्या शर्यतीत उतरा; तुम्हाला जिंकवण्याची जबाबदारी पक्षाची आहे, असे दमदार प्रतिपादन खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी केले. बीड-माजलगाव मतदारसंघातील शिवसंवाद बैठकीत ते बोलत होते. राज्यभर सुरू असलेल्या शिवसंवाद दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर बीडमधील हॉटेल निलकमल येथे ही महत्त्वपूर्ण बैठक उत्साहात पार पडली. बैठकीत तळागाळातील शिवसैनिक, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधत पक्ष संघटन मजबूत करण्यावर विशेष भर देण्यात आला.**

यावेळी बोलताना खा. शिंदे यांनी बीडमधील शिवसेनेच्या मतदानाचा उल्लेख करत,मागील निवडणुकांमध्ये बीड मतदारसंघात शिवसेनेला चांगले



मतदान झाले आहे. त्यामुळेच पक्षाने मंत्री भरतशेठ गोगावले यांच्याकडे बीड जिल्ह्याची महत्त्वाची जबाबदारी सोपवली आहे. पक्षाचे वरिष्ठ नेते बीडमध्ये सक्रियपणे काम करत आहेत, हीच पक्षाने दिलेली ताकद आहे, असे सांगितले. बैठकीत विधानसभा क्षेत्रनिहाय संघटनात्मक आढावा, तालुकानिहाय माहिती, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांचे नियोजन, संभाव्य उमेदवारांबाबत चर्चा, नेमणुका, बी.एल.ए. यादी आणि प्रशिक्षण यांसह विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर धनुष्यबाण अधिक मजबूत करण्यासाठी संघटनात्मक बांधणीवर भर देण्यात आला. दरम्यान बैठकीत विधानसभा क्षेत्रनिहाय संघटनात्मक आढावा, तालुकानिहाय माहिती, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांचे नियोजन, संभाव्य उमेदवारांबाबत चर्चा, एस.ई.ओ. नेमणुका, बी.एल.ए. यादी आणि प्रशिक्षण यांसह विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. दरम्यान, शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी बीड-माजलगाव मतदारसंघाचा सर्वंकष कार्यअहवाल सादर केला. यावेळी त्यांनी पदाधिकारी, शिवसैनिकांचे संघटनात्मक काम, स्थानिक विकासाचे मुद्दे तसेच आगामी राजकीय परिस्थितीबाबत आपले मत मांडले. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर धनुष्यबाण अधिक मजबूत करण्यासाठी संघटनात्मक बांधणीवर भर देण्यात आला. या बैठकीस रोजगार हमी व फलोत्पादन मंत्री तथा बीड जिल्हा संपर्कमंत्री भरतशेठ गोगावले, खा. संदीपान भुमरे पाटील, आमदार हेमंत पाटील, शिवसेना सचिव भाऊसाहेब चौधरी, माजी खासदार आनंदजी परांजपे, शिवसेना सचिव संजयजी माशीलकर, संजय लाखे, मराठवाडा विभागीय सचिव अशोकजी पटवर्धन, बीड जिल्हा संपर्कप्रमुख मनोजजी शिंदे, शिवसेना उपनेत्या संगीता ठोंबरे,विधानसभा संपर्काप्रमुख बाप्पुसाहेब मोरे, जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्यासह विविध अंगीकृत संघटनांचे अजीमाजी पदाधिकारी, महिला आघाडी, युवा सेना, शेतकरी सेना, अल्पसंख्यांक आघाडी, ओबीसी व्हीजेएनटी सेल, डॉक्टर सेल, विधी सेल, वाहतूक सेना, शिव उद्योग सेना, लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

### अनिलदादांकडे पक्षाचे विशेष लक्ष आहे - खा. डॉ. श्रीकांत शिंदे

बैठकीदरम्यान शिवसैनिकांना संबोधित करताना खा. डॉ. श्रीकांत शिंदे यांनी जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्याबाबत महत्त्वपूर्ण वक्तव्य केले. ''अनिलदादा जगताप यांच्याकडे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेबांसह पक्षाचे विशेष लक्ष आहे म्हणूनच शिवसेनेचे वरिष्ठ नेते मंत्री भरतशेठ गोगावले, शेजारच्या मतदार संघातील खा. संदीपन भूमरे, आमदार हेमंत पाटील आणि आमच्या ठाण्याचे मनोजजी शिंदे आम्ही संपर्कप्रमुख पदी दिले आहेत. यामुळे अनिलदादांकडे संपूर्ण पक्षाचे पूर्ण लक्ष आहे. कोणतीही चिंता करू नका. पक्ष संघटना बळकट करण्यावर भर द्या. योग्य वेळी योग्य न्याय मिळेल आणि पक्ष योग्य जबाबदारी निश्चितच सोपवेल, असे स्पष्ट आश्वासन खा. डॉ. श्रीकांत शिंदे यांनी दिले.

## पान १ वरून...

### खरीप हंगामावर

राहण्याची शक्यता व्यक्त केली आहे. महाराष्ट्रातही जून महिन्यात पावसाचा जोर कमी राहण्याचा अंदाज आहे. त्याचवेळी राज्यातील अनेक भागांत उष्णतेच्या लाटांचा इशाराही देण्यात आला आहे. विदर्भ, मराठवाडा आणि अंतर्गत महाराष्ट्रात कमाल तापमान सामान्यपेक्षा अधिक राहण्याची शक्यता असून, किमान तापमानही वाढलेले राहणार असल्याने रात्रीचा उकाडाही कायम राहू शकतो. सध्या प्रशांत महासागरात स्थिती न्यूट्रल असली तरी मान्सून काळात एल निनो परिस्थिती निर्माण होण्याची दाट शक्यता आयएमडीने व्यक्त केली आहे. ऐतिहासिकदृष्ट्या एल निनो वर्षांमध्ये महाराष्ट्रासह देशातील अनेक भागांत पावसाची तूट जाणवते. विशेषतः मध्य आणि पश्चिम महाराष्ट्रात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण होण्याचा धोका अधिक असतो. ने आपल्या अहवालात कमी पावसाचे परिणाम शेती, पाणीपुरवठा, जलविद्युत निर्मिती आणि पर्यावरणावर होऊ शकतात, असा इशारा दिला आहे. आधीच पाणीटंचाईचा सामना करणाऱ्या मराठवाडा आणि विदर्भासाठी हा अंदाज अधिक गंभीर मानला जात आहे. दरम्यान, संभाव्य संकट लक्षात घेऊन प्रशासनाने पाणी साठवण आणि संवर्धनाच्या उपाययोजना तातडीने राबवाव्यात, शेतीसाठी आपत्कालीन नियोजन करावे, उष्माघात टाळण्यासाठी थंड निवारा केंद्रे सुरू ठेवावीत, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करावी आणि आरोग्य यंत्रणा सज्ज ठेवावी, अशा सूचना तज्ज्ञांकडून करण्यात येत आहेत.

----------

### पुण्यात विषारी दारूचे १३ बळी

आहेत. त्यों कुटुंब या दारुकांडामुळे अक्षरशः उघड्यावर आलं आहे. या मृत्यूप्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, या प्रकरणात कुठल्या ठिकाणी विषारी दारू तयार झाली हे पोलिसांनी शोधून काढलेले आहे. याच्या पाठीमागे जे काही लोक आहेत, त्यांना अटक करण्यात आलेली आहे. आणखी काही लोक यात असू शकतात. ते शोधण्याचे काम सध्या सुरू आहे. ज्यांची प्रकृती गंभीर आहे त्यांना उपचार करून वाचवण्याचा प्रयत्न सुरू आहे. ही घटना अत्यंत गंभीर आहे.

----------

### नोंदी सापडलेल्या ५८ लाख मराठ्यांना

मग त्यांना अद्याप प्रमाणपत्रं का दिली नाहीत? राज्यात ज्या ५८ लाख कुणबी नोंदी मिळाल्या आहेत त्यांची यादी द्या. त्या ५८ लाखांपैकी किती जणांना कुणबी प्रमाणपत्र दिली याची माहिती द्या. मराठवाड्यात ज्या नोंदी सापडल्या आहेत त्यांना प्रमाणपत्र देऊ नका असे आदेश मुख्यमंत्री कार्यालयातून आले असल्याचा आरोप यावेळी मनोज जरांगे यांनी केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढे जाण्याचे कुणीच धाडस करत नाही. त्यामुळे त्यांनी हैदराबाद गॅझेट लागू करा, असा आदेश द्यावा, असे जरांगे म्हणाले. मनोज जरांगे यांच्याशी चर्चा करताना राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, राज्यात आतापर्यंत ३९ लाख कुणबी प्रमाणपत्र वाटप केले, त्याची यादी देतो. सरकारचा अतिशय प्रामाणिक प्रयत्न आहे. ज्या नोंदी सापडल्या आहेत त्यांची गावनिहाय, जिल्हानिहाय माहिती देतो. आपल्या विश्वासाला तडा जाऊ दिला जाणार नाही. १९९४ मध्ये त्यावेळच्या सत्ताधाऱ्यांनी चूक केली. मराठा समाजाला ओबीसीमध्ये घातले नाही. सातारा गॅझेटचा प्रस्ताव तयार झाला आहे. पण आगोदर हैदराबाद गॅझेटच्या विरोधात न्यायालयात सुनावणी सुरू आहे. त्याला स्थगिती मिळाली आहे. त्यामुळे आता लगेच सातारा गॅझेट आणले तर त्यालाही स्थगिती मिळू शकेल अशी भीती आहे, असे राधाकृष्ण विखे पाटलांनी माहिती दिली. नोंदी सापडलेल्या मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया थांबवणार नाही, हैदराबाद आणि सातारा गॅझेटची अंमलबजावणी करणार असे लेखी द्या, अशी मागणी यावेळी मनोज जरांगे यांनी केली.

-------------

### केजमध्ये काळीज पिळवटून

मुलगा व कुटुंब (पत्नी आणि मुले) आणि इतर नातेवाईक धानेगाव येथे त्यांच्या मामाकडे गेले होते. तिथून परत येत असताना, त्यांनी तलाव पाहण्याचे ठरवले. तलावाजवळ गेल्यानंतर पाण्यात उतरले असता, त्यांच्या भावाच्या मुलीचा पाय घसरला आणि ती पाण्यात बुडू लागली. भावाला पोहता येत नव्हते, तरीही स्वतःची मुलगी असल्यामुळे त्याने पाण्यात उडी घेतली. त्याने मुलीला सुखरूप बाजूला काढले, मात्र स्वतः पाण्यात बुडून त्याचा मृत्यू झाला. या अपघातानंतर कुटुंबाला काही आर्थिक मदत मिळावी या उद्देशाने ते खासदारांना निवेदन देण्यासाठी आले होते.

------------

### मावशीकडे आलेल्या दोन

यांच्या मालकीच्या पडक्या घराची जीर्ण भिंत अचानक कोसळली आणि दोन्ही चिमुकले तिच्या ढिगाऱ्याखाली दबले गेले. घटना लक्षात येताच नातेवाईक आणि ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेत ढिगाऱ्याखालून दोघांनाही बाहेर काढले. मात्र, शौर्य कासार याचा जागीच मृत्यू झाला होता. तर गंभीर जखमी अवस्थेतील चैतन्य भिसे याला तातडीने अंबड येथील उपजिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले होते. परंतु अंबडकडे नेत असतानाच त्याचीही प्राणज्योत मालवली. दोघांनाही उपजिल्हा रुग्णालयात दाखल केल्यानंतर वैद्यकीय अधिकारी डॉ. अंगद घुले यांनी मृत घोषित केले. घटनेची माहिती मिळताच अंबड पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत अकस्मात मृत्यूची नोंद केली. मृत चैतन्य भिसे हा आपल्या कुटुंबातील एकुलता एक मुलगा होता. त्याच्या पश्चात आई-वडील व दोन मोठ्या बहिणी आहेत. तर शौर्य कासार याच्या पश्चात आई-वडील, दोन मोठे भाऊ, चुलता-चुलती असा परिवार आहे. या दुर्दैवी घटनेमुळे घुंगर्डे हादगाव गावावर शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

------------

### विधानपरिषदेच्या तीन

शरद पवार पक्षाने, याबाबत निर्णय होण्याची शक्यता आहे. राज्यात स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील एकूण १७ जागांसाठी ही निवडणूक होत आहे. या जागेसाठी सोमवार (दि.२५) पासून अर्ज दाखल करण्यास सुरुवात झाली. मात्र, महायुतीत जागावाटपाचा पेच अद्याप सुटत नसल्याचे चित्र आहे. महायुतीत १७ पैकी १४ जागांच्या जागावाटपाचा पेच सुटल्यात जमा आहे. दुसरीकडे नाशिकसह छत्रपती संभाजीनगर आणि पुणे या तीन जागांचा पेच कायम आहे. महायुतीच्या समन्वय समितीच्या मंगळवारी (दि. २६) रात्री झालेल्या बैठकीतही तोडगा निघालेला नाही. भाजपने संख्याबळाच्या आधारे नाशिकच्याही जागेवर दावा ठोकला आहे. तर, शिवसेना शिंदे गट नाशिकवरचा दावा सोडण्यास तयार नाही. त्यामुळे भाजपने नाशिकच्या बदल्यात छत्रपती संभाजीनगरची मागणी केली आहे. 'शिवसेनेसोबत नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर यांपैकी एक जागा आम्हाला मिळाली पाहिजे, असा आमचा आग्रह आहे. तर राष्ट्रवादी काँग्रेसने आमच्याकडून पुण्याची जागा मागितली आहे. या दोनच गोष्टींवर आमचे अडले आहे,' असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अमित शहा यांची भेट घेतल्यानंतर स्पष्ट केले आहे. त्यामुळे नाशिकची जागा भाजप लढणार की, शिवसेना याचा 'सस्पेन्स' अद्यापही कायम आहे.

-----------

### कार्यालयात खेटा मारणं बंद,

१०५ तालुक्यांमध्ये या मोहिमेची एक जूनपासून अंमलबजावणी होणार आहे. राज्यात गेल्या अनेक वर्षांपासून मोजण्यांची प्रकरणे प्रलंबित राहत आहेत. त्याच्या तक्रारींची दखल घेऊन तत्कालीन महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी युद्धपातळीवर विविध प्रयत्न सुरू केले होते. मोजणी प्रकरणे निकाली काढण्यासाठी १२०० रोव्हर ही अत्याधुनिक मशिन खरेदी करण्यात आली. त्यापाठोपाठ भूकरमापकांची संख्या अपुरी असल्याने खासगी एजन्सीमार्फत भूकरमापकांची नियुक्ती करण्यात येत आहे.आजमितीला राज्यात ३४०० इतके भूकरमापक आहेत. गेल्या काही वर्षांपासून राज्यात लाखभर मोजण्या प्रलंबित होत्या. त्यांची संख्या कमी झाली आहे. मोजण्यांचा पूर्वीचा कालावधी हा ९० दिवसांवर आला असून, हा कालावधी एका महिन्यावर आणण्याचे भूमी अभिलेख विभागाचे प्रयत्न आहेत. खासगी भूमापकांची आता प्रत्येक जिल्ह्यात नियुक्ती करण्यात आली असून त्यांना प्रशिक्षणही देण्यात आले आहे. पूर्वी दृतगती मोजणी ही ३० दिवसांत; तर नियमित मोजणी ९० दिवसांत होत होती. १०५ तालुक्यांमध्ये या मोहिमेला सुरुवात होणार आहे.'महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सूचनेनुसार, मोजणीचा कालावधी आणखी कमी करण्यासाठी प्रयत्न सुरू करण्यात आले आहेत. रोव्हर्सची उपलब्धता, खासगी भूमापकांच्या नियुक्तीच्या पार्श्वभूमीवर तीन टप्प्यांत राज्यातील विविध विभागांतील जिल्ह्यांमध्ये कमी कालावधीत मोजणी प्रकरणे निकाली काढण्याचे नियोजन सुरू केले आहे. राज्यात १९ जिल्ह्यांतील १०५ तालुक्यांमध्ये १४ दिवसांत मोजणी करण्यात येणार आहे,' अशी माहिती जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख विभाग, शैलेश नवाल यांनी दिली.

**१०५ तालुके कोणते?**

सध्या कमी प्रमाणात मोजणीची प्रकरणे दाखल होत आहेत, असे काही जिल्हे राज्यात आढळले आहेत. त्याचा अभ्यास करून भूमी अभिलेख विभागाने नागपूर, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, नाशिक आणि कोकण या विभागांतील तालुक्यांची निवड केली आहे. कोकण विभागातील ठाणे, पालघर, रायगड; तसेच नाशिक विभागात नाशिक, जळगाव आणि नंदुरबार या जिल्ह्यांतील तालुक्यांचा समावेश आहे. छत्रपती संभाजीनगर विभागातील नांदेड, परभणी, जालना, लातूर; तसेच अमरावती विभागांमध्ये अमरावती, बुलडाणा, यवतमाळ आणि नागपूर विभागातील नागपूर, गडचिरोली, गोंदिया, चंद्रपूर, वर्धा, भंडारा या जिल्ह्यांतील तालुक्यांचा समावेश आहे.

------------

### कॉक्रोच पार्टीचे खाते ब्लॉकच

कुमार कौरव यांनी या प्रकरणी केंद्र सरकार आणि एक्स यांना नोटीस बजावली आहे. न्यायालयाने स्पष्ट केले की, या मुद्द्याचे परिणाम दूरगामी असल्याने, सरकारची बाजू ऐकून घेतल्यानंतरच निर्णय देता येईल, असे म्हटले. कॉकरोच जनता पार्टी च्या याचिकेवर सुनावणी करताना उच्च यालयाने म्हटले की, या पेजवरील मजकूर (कंटेंट) काहीसा आक्षेपार्ह वाटत आहे. न्यायमूर्ती पुरुषेंद्र कुमार कौरव यांनी स्पष्ट केले की, ''तुमच्या युक्तिवादात काही तथ्य असू शकते, परंतु त्या सर्वांचा विचार होणे आवश्यक आहे. दुसऱ्या बाजूची बाजू ऐकून घेतल्यानंतरच या सर्व बाबींचा सर्वांगीण विचार केला जाईल. यात दूरगामी परिणाम करणारे मुद्दे आणि व्यापक पैलू दडलेले आहेत,'' असे निरीक्षणही न्यायाधीशांनी नोंदवले. न्यायालयाने पुढे नमूद केले की, केंद्र सरकारने आपले सविस्तर उत्तर दाखल केल्यानंतर, एक्स ला खाते ब्लॉक करण्याचा आदेश (ऑर्डर) न्यायालयाच्या रेकॉर्डवर सादर करण्याचे निर्देश देता येतील की नाही, याची तपासणी केली जाईल. चार आठवड्यांच्या आत हे उत्तर दाखल करण्यात यावे, असा आदेश खंडपीठाने दिला आणि या प्रकरणाची पुढील सुनावणी ६ जुलै रोजी निश्चित केली. दिपके सध्या भारतात नसल्यामुळे, ते व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे आढावा समितीसमोर उपस्थित राहण्याची विनंती करू शकतात, असेही न्यायालयाने नमूद केले.

------------

### पेपरफुटी प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने

शुक्रवारी नीट-युजी पेपर लीक वादावरून राष्ट्रीय परीक्षा संस्थेला चांगलेच फटकारले. विविध सुरक्षा यंत्रणा आणि देखरेख समित्या कार्यरत असतानाही एवढी मोठी सुरक्षा त्रुटी कशी निर्माण झाली, असा सवाल न्यायालयाने उपस्थित केला. सोबत तुलना करताना सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की, देशातील सर्वोच्च नागरी सेवा परीक्षेत अशा प्रकारच्या घटना कधीही घडलेल्या नाहीत. त्यामुळे त्यांच्या कार्यपद्धतीतून धडा घेण्याची गरज आहे. यावेळी एनटीए आणि इस्रोचे माजी अध्यक्ष डॉ. के. राधाकृष्णन यांच्या नेतृत्वाखालील उच्चस्तरीय समितीच्या वतीने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता न्यायालयात हजर झाले होते. न्यायालयाने एटीए आणि डॉ. राधाकृष्णन यांनी दाखल केलेली प्रतिज्ञापत्रे नोंदवून घेतली. केंद्र सरकारला आपले उत्तर दाखल करण्यासाठी अतिरिक्त वेळ दिला. न्यायमूर्ती पी.एस. नरसिंहा यांनी डॉ. राधाकृष्णन यांना समितीच्या शिफारशींनंतर प्रत्यक्षात किती देखरेख ठेवली गेली, असा प्रश्न विचारला. डॉ. राधाकृष्णन यांनी देखरेख समितीवर नियुक्त होण्यापूर्वी उच्चाधिकार समितीमध्ये काम केले होते, हे लक्षात घेऊन न्यायमूर्ती नरसिंहा यांनी विचारले की, शिफारशींच्या अंमलबजावणीवर नेमकी किती देखरेख ठेवली गेली? तसेच, आधी शिफारस केलेल्या सुरक्षा उपायांचा अवलंब करूनही पेपर लीक कसा झाला? समितीने नेमका कोणत्या गोष्टींचा विचार केला नव्हता? अशी विचारणाही न्यायालयाने डॉ. राधाकृष्णन यांच्याकडे केली.

# प्राचार्य डॉ. प्रा. हनुमंत रणखांब; बहुआयामी व्यक्तिमत्व

**सुप्रसिध्द प्राध्यापक, साहित्यीक पत्रकार म्हणून महाराष्ट्रात नव्हे तर देशपातळीवर सुपरिचीत असलेले डॉ.प्रा. हनुमंत रणखांब यांना ३० मे रोजी वयाची ७५ वर्ष पूर्ण होत आहेत. शैक्षणिक, साहित्यिक आणि सामाजिक क्षेत्रात उतुंग व्यक्तीमत्व म्हणून ते सुपरिचित आहेत. बीड जिल्हयाच्या माजी खासदार स्व.केशरबाई क्षीरसागर उर्फ काकु यांच्या आमदार व खासदार काळामध्ये डॉ.प्रा. रणखांब यांनी स्वियसहाय्यक म्हणून काम केले. क्षीरसागर कुटुंबाचे ते एक सदस्य म्हणून प्रामाणिकपणे काम करतात.**



**डॉ. रणखांब सरांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त त्यांच्या अतुलनिय व अवर्णनिय व्यक्तीमत्वाचा परिचय करुन देणारा लेख.**

डॉ.प्रा. हनुमंत बाबुराव रणखांब हे गेल्या ५० ते ६० वर्षापासून शैक्षणिक, सामाजिक, पत्रकारीता आणि साहित्यीक क्षेत्रात कार्य करत आहेत. हिंदी, मराठी व ऊर्दू साहित्याची मोठी चळवळ त्यांनी उभी केली. डॉ.हनुमंत रणखांब यांचे शिक्षण प्राथमिक शिक्षण बीड येथे झाले. मराठवाडा विद्यापीठात एम.ए.हिंदी, एम.फील. व पीएच.डी. त्यांनी पूर्ण केले. बीड येथील सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर महाविद्यालयात त्यांनी हिंदी विभागात वरिष्ठ प्राध्यापक व विभाग प्रमुख म्हणून काम केले. तर शिरुर कासार येथे कालींकादेवी महाविद्यालयाचे ते प्राचार्य होते. विद्यार्थीप्रिय प्रोफेसर व प्राचार्य म्हणून त्यांचा नावलौकिक आहे. स्व.केशरबाई क्षीरसागर ऊर्फ काकू यांच्या खासदारकीच्या कारकिर्दीत डॉ.रणखांब यांनी स्वियसहाय्यक म्हणून महत्त्वाची कामगिरी बजावली. त्या काळात तत्कालीन रेल्वेमंत्री, पंतप्रधान, राष्ट्रपती यांच्यासह राजीव गांधी, ग्यानी झेलसिंग आदींच्या भेटी घेऊन बीड जिल्हयात रेल्वे सुरू होणे किती महत्त्वाचे आहे. आणि सदर रेल्वे मार्ग कसा होऊ शकतो? या बाबतीत अनेक बैठका झाल्या. सदर बैठकीस स्वियसहाय्यक म्हणून डॉ.रणखांब सर उपस्थित होते. रेल्वेसह अनेक योजना व उपक्रम आणण्यासाठी तत्कालीन खासदार सौ.केशरबाई क्षीरसागर ऊर्फ काकू यांच्या समवेत काम करण्यासाठी संधी मिळाली, हे आपले भाग्य असल्याचे डॉ.रणखांब सर सांगतात. प्रा.डॉ.हनुमंत रणखांब यांचे साहित्य क्षेत्रात मोठे योगदान आहे. हिंदीचे कवी म्हणून त्यांचा देश पातळीवर नावलौकीक झाला आहे. '' लाश '' हा कविता संग्रह १९७८ मध्ये प्रकाशित झाला. त्यांचे 'सिगरेट का धुआँ ' कहाणीसंग्रह, तर 'मुर्दा घर' हा कविता संग्रह प्रसिध्द आहे. अहिंदी भाषिक लेखकाद्वारे लिहिलेला लाश हा पहिला कविता संग्रह आहे. सन १९८२ भुवनेश्वर येथे व १९८४ ला विशाखापट्टनम येथे केंद्र शासनाच्या अखील भारतीय लेखन शिबीरात डॉ.रणखांब हे महाराष्ट्राचे एकमेव प्रतिनिधी निवडलेले होते. मराठी, हिंदी या विषयावरील अनेक कविता, लेख बीड , पुणे, व औरंगाबाद आकाशवाणी केंद्रावर त्यांचे काव्य वाचन व व्याख्यान कार्यक्रम झाले आहेत. गेल्या ४० ते ५० वर्षापासून शैक्षणिक आणि साहित्यीक क्षेत्राबरोबरच डॉ.हनुमंत रणखांब यांनी पत्रकारीतेच्या क्षेत्रात मोठे योगदान दिले. बीड येथील स्थानिक दैनिकात त्यांनी स्तंभलेखक म्हणून त्यांचे विविध लेख प्रकाशित झाले आहेत. 'साप्ताहिक प्रणाली' हे वृत्तपत्र सुरु करुन प्रसार आणि प्राचाराचे कार्य केले. डॉ.रणखांब यांच्या सुविद्य पत्नी सौ.नलिनी रणखांब 'साप्ताहिक प्रणाली'च्या संपादक आहेत. हिंदी ही राष्ट्र भाषा आहे. हिंदीचा प्रसार आणि प्रचार व्हावा, यासाठी प्रा.डॉ.हनुमंत रणखांब यांनी पत्नी सौ.नलिनी रणखांब यांच्या सहकार्याने ''बीड संवाद '' हे साप्ताहिक सुरु केले. पत्रकारीता क्षेत्रात गेल्या ५० वर्षात डॉ.राणखांब यांचे मोठे योगदान आहे. विविध क्षेत्रात काम करत असतांना डॉ.रणखांब यांचा सकारात्मक आणि रचनात्मक कार्यावर भर आहे. गेल्या ५० - ६० वर्षाच्या सामाजिक जीवनात त्यांनी सर्व स्तरातील असंख्य मित्र जोडले आहेत. काकू घराण्याशी त्यांचा पारिवारिक दृष्टया नाते जोडले गेले आहे. माजी खासदार स्व.केशर काकू आणि माजी मंत्री जयदत्त आण्णा क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली आपण शैक्षणिक, सामाजिक आणि साहित्यीक क्षेत्रात योगदान देऊ शकलो, याचा आत्मीक आनंद आणि समाधान असल्याचे डॉ.हनुमंत रणखांब सांगतात. सर्व क्षेत्रात उतुंग कामगिरी करणाऱ्या डॉ.प्रा.हनुमंत रणखांब यांचा अमृत महोत्सवी वाढदिवस मुंबई येथे साजरा होत आहे. त्या निमित्ताने अमृत महोत्सवी सोहळयाचे आयोजन करण्यात आले आहे. त्या निमित्ताने गुरुवर्य डॉ.प्रा.हनुमंत रणखांब यांना पुढील जीवनासाठी मनपूर्वक आरोग्यदायी शुभेच्छा ....!

**नारायण नागरे, बीड.**
**मो.९४२२७४४४०१**

cmyk

दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

शनिवार, दि. ३० मे २०२६



## थोडक्यात

### बौध्द धम्म संस्कार शिबिराचे आयोजन, बुध्द बांधवांनी लाभ घ्यावा

माजलगाव । प्रतिनिधी

येथील यशोधरा बुध्द विहार व प्रियदर्शी धम्म संस्कार शिक्षण संस्था बीड यांच्या संयुक्त विद्यमाने दि ०२ जुन ते १२ जुन या दहा दिवशीय येथील यशोधरा बुध्द विहार, फुले नगर येथे बौद्ध संस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे या शिबीराचा लाभ बौद्ध बांधवांनी घ्यावा असे आवाहन संयोजक भिक्खु धम्मशिल थेरो सह यशोधरा बुध्द विहाराचे बाबासाहेब जाधव, श्रीमती सुशीलाताई चांदमारे,एल आर मस्के, राजकुमार सोनवणे यांनी केले आहे



या शिबिराला भिक्खु धम्मशिल थेरो व भिक्खु पय्यावर्धन हे मार्गदर्शन करणार असुन शिबीरात ध्यानसाधना, धम्म प्रवचन,पालीभाषा, धम्म प्रचार, प्रसार, धम्म संस्कार, व्यसनमुक्ती,उपोसथ, तसेच धम्म चर्चा सत्र, व धम्माच्या बाबतीत असलेले प्रश्नोत्तरे,होणार आहे,धम्मप्रचार, प्रचार साठी अशा बौद्ध धम्म शिबिराचे आयोजन होणे अत्यंत आवश्यक आहे या शिबीराच्या माध्यमातून आपल्या येणाऱ्या तरुण पिढी धम्माचे सुसंस्कार पडणार आहेत आपल्या मुला , मुलींचे भावी जिवन हे उज्वल व चांगले बनविण्यासाठी आपल्या मुला मुलींना या शिबिरात सहभागी करावे.आपल्याला जे बौध्द धम्म विश्वरत्न, भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी दिला आहे आपले कल्याण बौद्ध धम्मातच आहे तरी या शिबिरात बौद्ध उपासक उपासिकेने आपल्या पाल्याला सहभागी करून बौद्ध संस्कारचा लाभ घ्यावा असे आवाहन यशोधरा बुध्द विहार कमिटी व प्रियदर्शी संस्कार संस्था बीड यांनी केले आहे

### नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून नुकसान भरपाई जाहीर करा –आंधळे

बीड । प्रतिनिधी

दिनांक २९ ५ २०२६ बीड जिल्ह्यामध्ये २६ तारखेला अवकाळी पावसामुळे गारपिटीने शेतकऱ्याचे प्रचंड नुकसान झाले आहे त्यामध्ये फळबाग असतील कांदा ,अशा अनेक फळांचे,जनावरांचे प्रचंड नुकसान झाले आहे. जनावराच्या चाऱ्याचेही मोठ्या प्रमाणात



नुकसान झाले आहे त्यामध्ये गंज लावलेली असेल गंजी देखील उडून गेलेल्या आहेत. बीड जिल्ह्यामध्ये चिंचवडगाव या ठिकाणी घरावरचे सर्व पत्रे उडालेले आहेत घरातील सामानाचेही नुकसान झालेले आहे व या भागातील लाईटचे सर्व पोल पडलेले आहेत कारण या अवकाळी पावसाचा केंद्रबिंदू चिंचवडगाव म्हटले तरी वावगे ठरणार नाही पूर्ण गावांमध्ये निसर्गाने तेथील कुटुंबावर घाला घातला आहे. चिंचाळा, नागरगोजे वस्ती, खापरवाडी, काडीवडगाव, देवगाव,हरिश्चंद्र पिंपरीतांडा, पिंपरी गाव, चिंचोटी, जोडआंबा, वलीपूर जवळा, मन्यारवाडी आंबेसावळी, घाटसावळी, ताडसोन्ना, केसापुरी परभणी, ढोरवाडी. या गावांमध्ये मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. बीड जिल्ह्यामध्ये झालेल्या अवकाळी पाऊस आणि तीव्र वादळामुळे शेतकऱ्याच्या अतोनात नुकसान झाले आहे या नैसर्गिक आपत्तीत केळीच्या बागा आणि उसाचे पीक भुई सपाट झाले असेल अनेक घरांची पडझड झाली आहे तसेच अनेक जनावरे दगावल्याची ही माहिती आहे अत्यंत दुर्दैवी बाब म्हणजे या वादळात केज तालुक्यातील एका शेतकऱ्याचा वीज पडून मृत्यू झाला आहे या पार्श्वभूमीवर नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ शासकीय मदत मिळावी यासाठी ग्रामीण युवक संघटनेच्या वतीने प्रयत्न सुरू आहेत केज तालुक्यातील शेतकरी आधीच संकटात आहे या अवकाळी पावसाने त्यांच्या तोंडचा घास हिरावून घेतला जात आहे प्रशासनाने तात्काळ पंचनामे करून प्रस्ताव शासनाकडे पाठवून शेतकऱ्यापर्यंत लवकरात लवकर भरघोस मदत पोहोचण्यासाठी कसा प्रयत्न करता येईल तो करावा अशी मागणी ग्रामीण युवक संघटनेच्या वतीने करण्यात येत आहे.

# माजलगावात विना परवाना वाळू वाहतूक करणारा हायवा पोलीसाकडुन जप्त

## हायवासह ३० लाख ३६ हाजारांचा मुद्देमाल जप्त

**माजलगाव । प्रतिनिधी**

**येथील ग्रामीण पोलिसांनी विना परवाना वाळू वाहतूक करणारा हायवा जप्त केला आहे.ही कार्यवाही पोलीस उपनिरीक्षक संदीप राठोड यांनी २९ मे शुक्रवार रोजी सकाळी ७.३० वाजण्याच्या सुमारास वाघोरा ते सुर्डी जाणाऱ्या रोडवर केली. दरम्यान या कार्यवाहीतून ३० लाखांहून अधिकांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असुन संबंधिता विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

यासंदर्भात मिळालेल्या माहितीनुसार तुकाराम कचरुबा आव्हाड वय ३२ वर्ष हा हायवामधून विनापरवाना बेकायदेशीररीत्या वाळूची वाहतूक करत असल्याची माहिती पोलीस उपनिरीक्षक संदीप राठोड यांना मिळाली होती. त्यानुसार माजलगाव ग्रामीण पोलिसांनी सापळा रचून दि.२९ मे शुक्रवार रोजी सकाळी ७:३० वाजण्याच्या सुमारास वाघोरा ते सुर्डी जाणाऱ्या रोडवर वाळू वाहतूक करणारा हायवा पकडला. तपासणी दरम्यान हा हायवा विनापरवाना वाळू वाहतूक करत असल्याचे निदर्शनास आले. पिवळ्या रंगाचा भारत बेन्झ कंपनीचा हायवा (क्रमांक एम.एच-२०-अए-२२०१) किंमत अंदाजे ३० लाख रुपये तसेच त्यामध्ये भरलेली अंदाजे ६ ब्रास वाळू किंमत ३६ हजार रुपये असा एकूण ३० लाख ३६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात गुरनं. २४०/२०२६ कलम ३०३(२) बीएनएस अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी म्हणून पोलिस कर्मचारी यांनी तक्रार दिली आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास परीवीक्षाधीन सहाय्यक पोलीस अधीक्षक राहुल कुमार हे करीत आहेत.



# चेक बाऊन्स प्रकरणी सोन्याच्या व्यापाऱ्याला ६ महिने सश्रम कारावास; ८ लाख १० हजारांचा दंड

## फिर्यादीतर्फे ॲड.तेजेस नेहरकर यांनी मांडला प्रभावी युक्तिवाद

बीड । प्रतिनिधी

गुंतवणुकीच्या नावाखाली घेतलेले पैसे परत करण्यासाठी दिलेला धनादेश (चेक) बँकेत अपुऱ्या निधीअभावी न वटल्याने (बाऊन्स झाल्याने) सोन्याचे व्यापारी अनिल शांतीलाल कोटेचा यांना न्यायालयाने दोषी ठरवत मा. न्यायालयाने त्यांना ६ महिने सश्रम कारावास आणि ८ लाख १० हजार रुपये द्रव्यदंडाची (नुकसान भरपाई) शिक्षा दिनांक.२७/५/२०२६ रोजी मा.मुख्य न्याय दंडाधिकारी बीड यांनी सुनावली. दंड न भरल्यास अतिरिक्त ४ महिने साध्या कारावासाची तरतूदही न्यायालयाने केली आहे. या प्रकरणात फिर्यादीतर्फे प्रसिद्ध वकील ड. तेजेस नेहरकर यांनी प्रभावी युक्तिवाद केला. या बाबत अधिक माहिती अशी की बीड येथील रहिवासी सुभाष भालेकर यांच्या फिर्यादीनुसार, शनिवार पेठ, महावीर चौक येथील सोन्याचे व्यापारी अनिल शांतीलाल कोटेचा यांनी भालेकर यांना सोन्याचे भाव वाढत असल्याचे सांगून व्यवसायात गुंतवणूक करण्याचे आमिष दाखवले होते. त्यानुसार फिर्यादी भालेकर यांनी ७ जानेवारी २०२१ रोजी कोटेचा यांच्याकडे ५,८०,००० रुपये गुंतवले. सहा महिन्यांनंतर ठरल्याप्रमाणे फिर्यादीने मूळ रक्कम आणि त्यावरील दीड लाख रुपयांचा फायदा, अशी एकूण ७,३०,००० रुपयांची मागणी केली. मात्र, आरोपी कोटेचा यांनी 'अजून पैसे वाढतील, घाई करू नका' असे सांगून पैसे देण्यास टाळाटाळ केली.



**नफा तर सोडाच, मूळ रक्कमही बुडाली!**

सततच्या तगाद्यानंतर आरोपीने फिर्यादीला धक्कादायक माहिती दिली की, 'तुझे पैसे वाढले तर नाहीतच, उलट व्यवसाय नुकसानीत गेला आहे.' यामुळे घाबरलेल्या फिर्यादीने 'मला नफा नको, माझी मूळ रक्कम तरी परत द्या' अशी विनंती केली. त्यानंतर आरोपीने वैद्यनाथ अर्बन को. ऑप. बँक लि. (शाखा बीड) चा ५,८०,००० रुपयांचा धनादेश (क्र. २३५४९१) भालेकर यांना दिला.

फिर्यादीने १६ ऑक्टोबर २०२१ रोजी हा धनादेश आपल्या श्री. छत्रपती राजर्षी शाहू अर्बन को. ऑप. बँक लि. (शाखा बीड) मध्ये वटवण्यासाठी टाकला. मात्र, आरोपीच्या खात्यात 'अपुरा निधी' असल्याने तो धनादेश न वटता परत आला.

**न्यायालयीन लढाई आणि ऐतिहासिक निकाल**

धनादेश अनादरित झाल्यानंतर फिर्यादी सुभाष भालेकर यांनी न्यायालयात धाव घेतली. या प्रकरणी ड.उ.उ. ५८/२०२२ (सुभाष विरुद्ध अनिल) नुसार खटला दाखल करण्यात आला.

न्यायालयीन कामकाजा दरम्यान फिर्यादीचे वकील ड. तेजेस नेहरकर यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या ऐतिहासिक 'रंगप्पा विरुद्ध मोहन (२०१०)' या खटल्याचा दाखला देत सर्व सबळ पुरावे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद आणि पुरावे ग्राह्य धरून मा. न्यायालयाने आरोपी अनिल शांतीलाल कोटेचा याला फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५ (२) अन्वये, पराक्रम्य संलेख अधिनियम, १८८१ च्या कलम १३८ अंतर्गत दोषी ठरवले. ६ महिने कठोर कारावासासह ८,१०,०००/- रुपये द्रव्यदंड (नुकसान भरपाई ची शिक्षा ठोठावली. तसेच दंड न भरल्यास अतिरिक्त ४ महिने साध्या कारावासाची शिक्षेची तरतूद केली आहे. या महत्त्वपूर्ण प्रकरणात फिर्यादीच्या वतीने ड. तेजेस नेहरकर यांनी मुख्य वकील म्हणून काम पाहिले, तर त्यांना ड. गौतम नाईकवाडे, ड. आर. व्ही. राठोड, ड. सिकंदर शेख, आणि ड. दत्ता केसकर यांनी मोलाचे सहकार्य केले. न्यायालयाच्या या निर्णयामुळे चेक बाऊन्स प्रकरणातील आरोपींना मोठी चपराक बसली आहे.

# बीड जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने पेट्रोल डिझेल दरवाढी विरोधात आंदोलन

बीड । प्रतिनिधी

राज्यामध्ये मागील काही दिवसांपासून पेट्रोल डिझेल गॅसचा तुटवडा मोठ्या प्रमाणात सुरू असुन आज बीड जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांच्या नेतृत्वात बीड येथे आंदोलन करून जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.




यावेळी बोलताना जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे म्हणाले की, सध्या शेतीच्या मशागतीचे दिवस सुरू असून पेट्रोल डिझेल टंचाई व दरवाढ सुरू आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड मोठे नुकसान व मानसिक हानी सुरू आहे मात्र पंतप्रधान मोदी परदेशात जावून चॉकलेट वाटण्याचे लाजिरवाणे काम करत आहेत. मागील १२ वर्षापासून देशात आणि राज्यात भाजपची एक हाती सत्ता असताना देखील महागाईवर कुठलेही नियंत्रण यासरकरचे दिसत नाही. लोकहिताच्या कुठल्याही योजना न आणता मन की बात करत देशातील जनतेची फसवणुक करण्याचे काम नरेंद्र मोदी व भारतीय जनता पक्ष करत असुन वाढलेली महागाई हे या सरकारचे नाकरते पणाचे लक्षण आहे. जर इंधनाचा तुटवडा कमी करून दरवाढ कमी नकेल्यास येणाऱ्या काळात बीड जिल्ह्य काँग्रेस पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असे आवाहन जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांनी केले यावेळी प्रवीणकुमार शेप, बाळासाहेब ठोंबरे, दादासाहेब मुंडे, गणेश राऊत, गणेश बजगुडे, महावीर मस्के, परवेज कुरेशी, मीनाक्षी ताई पांडुळे, दत्ता कांबळे, संभाजी जाधव, प्रकाश मुंडे, राहुल जाधव, प्रवीण खोडसे, सय्यद फारुख, आकाश गायकवाड, शिवाजी कोटुळे,शिवाजी देशमुख, इलियास टेलर, शेख मोहसिन, शेख अमर, गणेश कारंडे, शेख नौशाद, अशोक केदार, अशोक बहिरवाल, विशाल मस्के, हरिभाऊ सावंत, राम शेळके, शेख मुशर्रफ, अविनाश दरपे, उद्धव जोगदंड, विजय पवार, कल्याण टेकाळे, विष्णू मस्के, मनोहर गीते, शेख जाहीर, शाम मुंडे, दीपक कराड, जमील खान यांच्यासह आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# केरळचे माजी मुख्यमंत्री कॉम्रेड पिनराई विजयन यांच्या निवासस्थानी राजकीय सूड भावनेतून ईडीच्या धाडीचा निषेध

माजलगाव । प्रतिनिधी

केरळचे माजी मुख्यमंत्री आणि माकपचे पॉलिट ब्युरो सदस्य पिनराई विजयन यांच्या निवासस्थानी ईडी ने टाकलेल्या धाडीच्या निषेधार्थ भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) च्या वतीने दि २९ मे शुक्रवार रोजी माजलगाव तहसील कार्यालयावर निदर्शने करण्यात आली.




पिनराई विजयन यांच्या निवासस्थानी टाकलेली धाड ही राजकीय सूडबुद्धीने प्रेरित कारवाई आहे. कारण न्यायालयांनी वारंवार स्पष्ट केले आहे की पिनराई विजयन यांचा एक्सालॉजिक प्रकरणाशी कोणताही संबंध नाही,तरीही त्यांच्या विरोधातील राजकीय छळ मोहीम अखंड सुरू आहे.केरळचे काँग्रेसचे नवीन मुख्यमंत्री व्ही.डी. सतीशन यांच्या दिल्लीतील पंतप्रधानांसोबतच्या बैठकीनंतर लगेचच अशी कारवाई होणे गंभीर प्रश्न निर्माण करणारे असून हे राजकीयरीत्या रचलेले नाट्य असल्याचे दिसते. सी.एम.आर.एल डायरीत ज्यांची नावे असल्याचे सांगितले जाते, असे अनेक जण आजही राज्य सरकारमध्ये महत्त्वाच्या पदांवर आहेत.मात्र त्यांच्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करून केवळ पिनराई विजयन यांनाच सातत्याने लक्ष्य केले जात असल्याने या कारवाईमागील राजकीय सूडबुद्धी अधिक स्पष्ट होते.

कोणत्याही चौकशी प्रक्रियेत अडथळा आणण्याचा आमच्या पक्षाचा कोणताही हेतू नाही.मात्र राजकीय लक्ष्य साधण्यासाठी केंद्र सरकारकडून केंद्रीय यंत्रणांचा उघड गैरवापर सहन केला जाणार नाही.केंद्रीय यंत्रणांचा गैरवापर करून केंद्रात सत्तेत असलेले भाजप सरकार जनतेच्या लोकशाही हक्कांवर हल्ला करत आहे याचा मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष माजलगाव च्या वतीने निदर्शने करून जाहीर निषेध करण्यात आला.यावेळी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे तालुका सचिव शिवाजी कुरे, मुसद्दीक बाबा, मोहन जाधव, सुहास झोडगे, बळीराम भुबे, कृष्णा सोळंके,बंडू राम गरड,सय्यद रज्जाक, विजयराठोड,उषा औसे,विठ्ठल सक्राते,स्वाती सक्राते,चंद्रकांत गाते,रत्नाकर गोळेकर,इत्यादी सहभागी होते.

# पाटोदा तालुक्यात पांदण रस्त्यांच्या कामात मोठा भ्रष्टाचार

## वंचित बहुजन आघाडीचा ४ जून रोजी 'कुलूप ठोक' आंदोलनाचा इशारा

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील पांदण रस्त्यांच्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार, बोगसगिरी आणि निकृष्ट दर्जाचे काम होत असल्याचा गंभीर आरोप वंचित बहुजन आघाडीने केला आहे. या संदर्भात वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष सचिन विलास मेघडबर आणि माजी तालुका अध्यक्ष बाळासाहेब गायकवाड यांनी गट विकास अधिकारी (इऊज), पंचायत समिती पाटोदा यांना लेखी निवेदन देऊन आंदोलनाचा इशारा दिला आहे.

पाटोदा तालुक्यात सध्या पांदण रस्त्यांची अनेक कामे सुरू आहेत, परंतु ही कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची आणि नियमबाह्य पद्धतीने केली जात असल्याचे निवेदनात म्हटले आहे. प्रत्यक्ष कामावर मजूर हजर नसतानाही त्यांची बोगस हजेरी लावणे आणि बनावट (ॐश्रिळ-लरींश) जीएसटी बिले जोडून शासनाची आर्थिक फसवणूक करण्याचे प्रकार सर्रास सुरू आहेत. धक्कादायक बाब म्हणजे, या भ्रष्टाचाराविरोधात आवाज उठवणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांना काही ठिकाणी राजकीय कार्यकर्त्यांकडून मारहाण आणि दमदाटी केली जात आहे. प्रशासकीय दुर्लक्षामुळे अशा गुंडप्रवृत्तीच्या लोकांचे धाडस वाढत चालले असून कार्यकर्त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

यापूर्वी दोन ते तीन वेळा लेखी तक्रारी देऊनही पंचायत समिती कार्यालयाने यावर कोणतीही ठोस कारवाई केलेली नाही, ज्यामुळे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर संशय व्यक्त केला जात आहे. या पार्श्वभूमीवर, सचिन मेघडबर यांनी मागणी केली आहे की, या संपूर्ण प्रकरणाची तात्काळ निष्पक्ष चौकशी व्हावी, दोषींवर कडक कायदेशीर कारवाई करण्यात यावी आणि चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधित कामांची बिले कोणत्याही परिस्थितीत अदा करू नयेत.

जर प्रशासनाने या निवेदनाची तातडीने दखल घेऊन कारवाई सुरू केली नाही, तर येत्या *०४/०६/२०२६* रोजी सकाळी ११:०० वाजता पाटोदा पंचायत समिती कार्यालयाला 'कुलूप ठोक'* आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. या आंदोलनामुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीला सर्वस्वी प्रशासन जबाबदार राहील, असेही या पत्रात स्पष्ट करण्यात आले आहे. सदर पत्राच्या प्रती जिल्हाधिकारी बीड, तहसीलदार पाटोदा आणि पोलीस निरीक्षक पाटोदा यांनाही पुढील कार्यवाहीसाठी पाठवण्यात आल्या आहेत.

## पान ६ वरुन...

### जिल्ह्यात चक्रीवादळाचा

कंपनी व प्रशासनाकडे तातडीने मदतीची मागणी केली आहे:

कंपनीकडे मागणी: 'सीआरआय' कंपनीच्या अधिकाऱ्यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देऊन पंचनामा करावा आणि नुकसानग्रस्त सौर ऊर्जा पंप लवकरात लवकर बदलून (ठशश्रिरलश) द्यावा.

शासकीय प्रशासनाकडून अपेक्षा: स्थानिक महसूल व कृषी विभागानेही या आपत्तीची गांभीर्याने दखल घेऊन नुकसानीचा शासकीय अहवाल तयार करावा आणि संबंधित शेतकऱ्याला योग्य ती आर्थिक मदत व सहकार्य मिळवून द्यावे, अशी रास्त अपेक्षा चिंचवडगाव परिसरातील शेतकऱ्यांमधून व्यक्त होत आहे.

### माजलगाव धरण

धरणाच्या सुरक्षेस धोका निर्माण करण्यात आला.तसेच वाहतुकीस अडथळा व सुरक्षेला धोका निर्माण झाल्याची तक्रार दिल्याने अज्ञात १० ते १२ जणांविरुद्ध माजलगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा करण्यात आला असून या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक माकणे हे करत आहेत.

### दुष्काळी आष्टी-पाटोदा-शिरूरच्या

भागासाठी विशेष आराखडा तयार करण्याची मागणी केली. गोदावरी खोऱ्यातील अतिरिक्त पाणी नियोजनबद्ध पद्धतीने वळविले तर आष्टी, पाटोदा, शिरूरसह बीड जिल्ह्याचा मोठा भाग सिंचनाखाली येऊ शकतो, असा दावा यावेळी करण्यात आला.

मुख्य अभियंता प्रकाश मिसाळ यांनी शिष्टमंडळाच्या मागण्यांची सकारात्मक दखल घेत तांत्रिक बाबींचा अभ्यास करून शासन स्तरावर प्रस्ताव सादर करण्यात येईल, असे आश्वासन दिल्याची माहिती सूत्रांनी दिली.

मान्यवरांची उपस्थिती

या वेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे आष्टी-पाटोदा-शिरूर तालुकाध्यक्ष, महेश सहकारी साखर कारखान्याचे संचालक मंडळ, विविध पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्थानिक प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पाणीप्रश्नावर सर्वपक्षीय पातळीवर एकत्रित लढा उभारण्याची गरजही यावेळी व्यक्त करण्यात आली.

### खासदार श्रीकांत

शिवसेना कार्यकर्त्यांचे फोटो नसल्याची चर्चा शहरात रंगली होती. त्यामुळे स्थानिक पदाधिकाऱ्यांमध्ये नाराजी असल्याचीही चर्चा राजकीय वर्तुळात सुरू होती. अनेक दिवसांपासून शहरात शांत असलेली शिवसेना अचानक सक्रिय झाल्याचे चित्र या आंदोलनातून पाहायला मिळाले.

गोंधळ झाल्याने काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. परिस्थिती हाताबाहेर जाण्याची शक्यता लक्षात घेता पोलिसांनी तातडीने हस्तक्षेप करत परिस्थिती नियंत्रणात आणली. या आंदोलनामुळे मुख्य रस्त्यावर काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती.पाटोद्यातील या प्रकारामुळे बीड जिल्ह्यातील राजकीय वातावरण आणखी तापण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, आगामी स्थानिक राजकारणात याचे पडसाद उमटण्याची चर्चा सुरू आहे.

पंतप्रधान मोदी यांच्या आवाहनाला हरताळ? खासदार श्रीकांत शिंदे यांचा भला मोठा ताफा चर्चेत

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सातत्याने ''इंधन बचत हीच खरी देशसेवा'' असे आवाहन करत साधेपणाचा संदेश दिला असताना, शिवसेनेचे खासदार व नेते श्रीकांत शिंदे यांच्या बीड जिल्हा दौऱ्यातील भल्या मोठ्या वाहन ताफ्याची सर्वत्र चर्चा रंगली आहे. खासदार श्रीकांत शिंदे हे बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले असता त्यांच्या स्वागतासाठी आणि दौऱ्यासाठी मोठ्या प्रमाणात वाहनांचा ताफा सहभागी झाला होता. अनेक चारचाकी गाड्या, कार्यकर्त्यांची गर्दी आणि मोठा लवाजमा यामुळे शहरातील नागरिकांचे लक्ष वेधले गेले. वाढती महागाई, पेट्रोल-डिझेलचे वाढते दर आणि सामान्य नागरिकांना भेडसावणाऱ्या आर्थिक अडचणींच्या पार्श्वभूमीवर हा मोठा ताफा चर्चेचा विषय ठरला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इंधन बचतीचे वारंवार आवाहन केले असताना, त्याच पक्षाच्या नेत्यांच्या दौऱ्यात मोठ्या प्रमाणावर वाहनांचा वापर झाल्याने नागरिकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत. ''सामान्य नागरिकांनी इंधन बचत करावी आणि नेत्यांनी मोठे ताफे घेऊन फिरावे का?'' असा सवालही काही नागरिकांनी उपस्थित केला. दरम्यान, पाटोदा शहरात श्रीकांत शिंदे यांच्या ताफ्याविरोधात काही ठिकाणी नाराजी व्यक्त करण्यात आली. ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी काळे झेंडे दाखवत घोषणाबाजी केली. त्यामुळे काही काळ परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.या दौऱ्यामुळे बीड जिल्ह्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, आगामी काळात याचे राजकीय पडसाद उमटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### गेवराई पोलीस ठाण्याकडून

वाळू असा एकूण ८,०६,०००/- रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरून गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ३३०/२०२६, भारतीय न्याय संहिता () कलम ३०३(२), ३०५(ई) सह खाण व खनिज अधिनियम १९५७ चे कलम ४, २१ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

**कारवाईत सहभागी पोलीस पथक:**

सदर धडक कारवाई वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली गेवराईचे पोलीस निरीक्षक किशोर पवार, सहाय्यक पोलीस निरीक्षक जंजाळ, पोलीस हवालदार हंबर्डे (बकल नंबर ९५४), कल्याण राठोड (बकल नंबर २२३), पोलीस कॉन्स्टेबल खांडेकर (बकल नंबर २१९८), गोरक्ष डोके (बकल नंबर २४१), पोटे (बकल नंबर २१०४) आणि होमगार्ड सुतार (बकल नंबर ९९७) यांच्या पथकाने यशस्वीरित्या पार पाडली.

### पाटोद्यात आरोग्य व्यवस्थेचे

त्यांना पुढील उपचारासाठी बीड येथे रेफर केले. मात्र बीडकडे नेत असताना रस्त्यातच मधुकर जावळे यांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर जावळाला गावासह संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत असून नागरिकांनी आरोग्य विभागाच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.ग्रामीण भागातील नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीत तातडीने आरोग्य सुविधा मिळत नसल्याने सर्वसामान्यांचे जीव धोक्यात येत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त.

cmyk

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
शनिवार दि.३० मे २०२६


# हिंगोली हळद बाजारात लिलाव सुरु होण्याच्या हालचाली; बाजार समिती प्रशासनाच्या व्यापाऱ्यांना सूचना

हिंगोली / प्रतिनिधी

हिंगोली येथील हळद मार्केट यार्डात जागा शिल्लक नसल्यामुळे लिलाव बंद ठेवण्याचा निर्णय बाजार समितीने घेतला आहे; परंतु ऐन पेरणीच्या तोंडावर मार्केट यार्ड बंद राहिले तर शेतकरी अडचणीत येण्याची शक्यता आहे.अ त्यामुळे व्यापाऱ्यांनी साठवलेल्या थप्प्या तातडीने उचलून घ्याव्यात, अशा सूचना बाजार समितीने केल्या असून, लवकरच हळद खरेदी-विक्रीचे व्यवहार पूर्ववत होण्याची शक्यता आहे.मागील आठवडाभरापासून डिझेल टंचाईचा सामना करावा लागत असल्याने खरेदी केलेली हळद राज्यासह परराज्यात पाठविण्यासाठी वाहने मिळत नसल्याने व्यापारी अडचणीत आले आहेत. खरेदी केलेला माल अडकून पडल्याने साखळी तुटली आहे.



शिवाय मार्केट यार्डात व्यापाऱ्यांनी खरेदी केलेल्या हळदीच्या थप्प्या असल्याने शेतकऱ्यांची हळद टाकण्यासाठी पुरेशी जागा शिल्लक नाही. त्यामुळे बाजार समिती प्रशासनाने २६ मेपासून हळद खरेदी-विक्रीचे व्यवहार बंद ठेवले आहेत. बाजार समितीचे मार्केट यार्डातील हळद खरेदी-विक्री बंद होताच खुल्या बाजारात भाव पडतात. मंगळवारपासून मार्केट यार्ड बंद ठेवण्यात आल्यामुळे बुधवारी क्विंटलमागे ५०० ते ७०० रुपयांची घसरण झाल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. त्यामुळे बाजार समिती प्रशासनाने मार्केट यार्ड तातडीने सुरू करावे, अशी मागणी शेतकऱ्यांतून होत आहे. सध्य स्थितीत मार्केट यार्डातील ओटा आणि टिनशेडमध्ये साठविण्यात आलेल्या हळदीच्या थप्पींचा अहवाल सहायक निबंधक कार्यालयाने मागितला आहे. त्यामुळे बाजार समिती प्रशासनाने आता मार्केट यार्ड सुरू व्हावे, यासाठी हलचाली वाढविल्या असून, व्यापाऱ्यांनी साठविलेली हळद तातडीने इतरत्र हलविण्याच्या सूचना केल्या आहेत. सध्या पावसाळ्याचे आणि पर्यायाने खरीप पेरणीचे दिवस जवळ येत आहेत. अशा महत्त्वपूर्ण काळात जिल्ह्यातील प्रमुख हक्काची बाजारपेठ असलेले हळद मार्केट बंद ठेवणे कोणत्याही दृष्टीने योग्य नाही. जर खरेदी झालेली हळद वेळेत उचलली गेली नाही, तर नवीन मालाची आवक थांबते आणि पर्यायाने बाजारपेठ ठप्प होते. हीच अडचण ओळखून व्यापाऱ्यांनी लवकरात लवकर थप्प्या उचलून मार्केट पूर्ववत चालू करण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन बाजार समिती प्रशासनाने केले आहे.

## डिएपी खताला पर्यायी खते



राज्यामध्ये मागील ३ वर्षात खरीप हंगामात ४४ लाख मे.टन रासायनिक खतांचा वापर झाला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने युरिया, डीएपी, एमओपी (म्युरेट ऑफ पोटॅश), संयुक्त खते व एसएसपी (सिंगल सुपर फॉस्फेट) या खतांचा वापर केला जातो. महाराष्ट्र राज्य हे मृद परिक्षण व जमिन आरोग्य पत्रिकांचे आधारे एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन प्रणाली वापराकरीता अग्रेसर आहे. राज्यामध्ये लवकरच पेरणीला सुरुवात होणार असून डिएपी खताची शेतकऱ्यांकडून जास्त मागणी होणार आहे. डिएपी खतामध्ये १८ टक्के नत्र तर ४६ टक्के स्फुरद ही अन्नद्रव्य आहेत.

राज्यामध्ये डीएपी खताचा पुरवठा अपेक्षेप्रमाणे होत नाही त्यामुळे पर्यायी खत वापरणे गरजेचे आहे. स्फुरदयुक्त खतामध्ये डीएपी खतानंतर एसएसपी या खताची सर्वाधिक मागणी आहे. एसएसपी खत हे देशातंर्गत तयार होत असून यामध्ये स्फुरद-१६ टक्के सह सल्फर व इतर सूक्ष्म अन्नद्रव्ये आढळून येतात. सल्फर अन्नद्रव्यामूळे तेलबिया पिकांमध्ये एसएसपी खताचा वापर फायदेशीर ठरणार आहे. डिएपी खताच्या एका गोणी ऐवजी युरिया अर्धी गोणी व एसएसपी तीन गोणी खतांचा वापर डिएपीस चांगला पर्याय आहे. एसएसपी बरोबरच संयुक्त खते जसे की एनपीके-१०:२६:२६, एनपीके-२०:२०:०:१३, एनपीके-१२:३२:१६, युरिया एसएसपी कॉम्पलेक्स व एनपीके-१५:१५:१५ या खतांच्या वापरामुळे नत्र व स्फुरद बरोबरच पालाश हे अन्नद्रव्य सुध्दा पिकांना उपलब्ध होते. त्यामुळे या संयुक्त खतांचा वापर केल्यास पिकांसाठी पोषक ठरतो.

त्याचबरोबर टिएसपी या खतामध्ये ४६ टक्के स्फुरद अन्नद्रव्याची मात्रा असुन डिएपी खताच्या एका गोणी ऐवजी युरिया अर्धी गोणी व टिएसपी एक गोणी खतांचा वापर केल्यास तो देखील डिएपी खतास उत्तम पर्याय आहे. चालू खरीप हंगामामध्ये शेतकऱ्यांनी केवळ डिएपी खतावरच अवलंबून न राहता बाजार मध्ये उपलब्ध असलेल्या पर्यायी खतांचा वापर करण्याचे आवाहन कृषी विभागाकडून राज्यातील सर्व शेतकरी बांधवाना करण्यात येत आहे.

## अंजीराची शेती नेहमीच ठरते फायद्याची

भारतात अंजीर पिकवणे शेतकऱ्यांसाठी खरोखरच महत्त्वाचे आहे कारण ते विकून भरपूर पैसे कमवू शकतात. अंजीर देखील आपल्यासाठी खरोखर चांगले आहे आणि आपल्याला निरोगी ठेवण्यास मदत करू शकते. अंजीरमध्ये जीवनसत्त्वे आणि फायबरसारख्या अनेक चांगल्या गोष्टी असतात. आपण ते ताजे किंवा वाळलेले खाऊ शकता. औषध बनवण्यासाठीही त्यांचा वापर करतात. अंजीर उगवणारे महाराष्ट्र हे भारतातील अव्वल राज्य आहे. अंजीर महाराष्ट्रात व्यवसाय म्हणून घेतले जाते आणि ते तामिळनाडू, कर्नाटक, गुजरात आणि उत्तर प्रदेशच्या काही भागांमध्ये देखील ते घेतले जाते. अंजीराच्या अनेक जाती विकसित केल्या आहेत. काही चांगल्या जाती खालीलप्रमाणे आहेत, पंजाब अंजीर, पुणे अंजीर, मार्शलीस अंजीर, पुणेरी अंजीर. अंजीर वाढवण्यासाठी, तुम्हाला उबदार, कोरडे हवामान आणि चांगली माती असलेली जागा आवश्यक आहे जी खूप ओली नाही. मातीमध्ये विशिष्ट प्रमाणात आंबटपणा असणे आवश्यक आहे आणि त्यातून पाणी सहजपणे वाहून गेले पाहिजे. अंजीरांना चांगली वाढ होण्यासाठी आणि भरपूर फळे येण्यासाठी २५ ते ३५ अंश तापमानाची आवश्यकता असते.




फील्ड तयारी : अंजीर पिकवण्यासाठी मोकळी माती लागते. सर्व प्रथम, रोपाचे जुने भाग विशेष मशीनने काढून शेत स्वच्छ करा. नंतर, माती फोडण्यासाठी आणि मोकळी करण्यासाठी दुसरे मशीन वापरा. यानंतर, शेत गुळगुळीत करून सपाट करा. यानंतर, जमिनीत सुमारे ५ मीटर अंतरावर खड्डा खणणे. शेवटी या खड्ड्यांमध्ये अंजिराची झाडे लावा आणि त्यांना थोडे पाणी द्या.

पेरणी आणि बियाणे प्रमाण : अंजिराची झाडे हलवण्याची उत्तम वेळ म्हणजे जुलै आणि ऑगस्टमध्ये पावसाळा. हे करण्यासाठी, आपण एकतर रोपे वाढवण्यासाठी स्वतःची जागा बनवू शकता किंवा त्यांची विक्री करणाऱ्या स्टोअरमधून काही खरेदी करू शकता. प्रत्येक मोठ्या क्षेत्रासाठी आपल्याला सुमारे २५० रोपांची आवश्यकता असेल. झाडे एकमेकांपासून ५ मीटर अंतरावर ठेवण्याची खात्री करा.

सिंचन व्यवस्था : जेव्हा आपण अंजीर पिकवतो तेव्हा आपल्याला हंगामानुसार वेगवेगळ्या वेळी पाणी द्यावे लागते. जर आपण त्यांना पावसाळ्यात लावले, जे सहसा जुलै आणि ऑगस्टमध्ये असते, तर आपल्याला त्यांना पावसापासून जितके पाणी मिळते तितके पाणी द्यावे लागत नाही. हिवाळ्यात दर १४ ते २० दिवसांनी पाणी द्यावे लागते. उन्हाळ्यात, अंजीरच्या झाडांना भरपूर पाणी लागते, म्हणून आपल्याला आठवड्यातून दोनदा पाणी द्यावे लागते. पावसाळ्यात आपल्याला त्यांना पाणी द्यावे लागत नाही, परंतु जर पुरेसा पाऊस पडला नाही तर आवश्यकतेनुसार पाणी द्यावे लागते.झाडांची काळजी : जर तुम्हाला तुमच्या अंजिराच्या झाडांना जास्त फळे द्यायची असतील तर तुम्हाला त्यांची चांगली काळजी घ्यावी लागेल. एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे जमिनीत रोपे लावल्यानंतर वर्षभरात रोपांची छाटणी करणे. जेव्हा तुम्ही झाडे कापता तेव्हा त्यावर एक मीटर उंचीपर्यंत नवीन फांद्या वाढणार नाहीत याची खात्री करा. तसेच, कोणत्याही लांब फांद्या कापून टाका. हे रोपाला नवीन शाखा वाढण्यास आणि निरोगी होण्यास मदत करेल, ज्यामुळे त्याला अधिक फळे येण्यास मदत होईल. प्रत्येक उन्हाळ्यात तुमची अंजीर फळे येईपर्यंत छाटून टाकावीत.

## अननसाच्या पानांपासून गाई-म्हशींसाठी पौष्टिक चारा

शेतीसोबतच पशुपालन करून शेतकरी आपले उत्पन्न वाढवू शकतात. यासाठी शासनाकडून अनेक प्रकारच्या योजना राबविण्यात येत असून त्यातून त्यांना लाभ मिळत आहे. भारतातील दुधाचे उत्पादन दुधाच्या मागणीच्या प्रमाणात कमी असल्याने देशातील दुधाचे उत्पादन वाढविण्याच्या दिशेने सरकार प्रयत्नशील आहे. दूध उत्पादन वाढवण्यासाठी शेतकरी हंगामानुसार जनावरांना हिरवा व सुका चाराही देतात. परंतु पौष्टिक चाऱ्याच्या कमतरतेमुळे जनावरांच्या दूध उत्पादनावर परिणाम होत आहे. दुभत्या जनावरांना कोणत्याही प्रकारचा चारा देता येत नाही, कारण त्यांची दूध उत्पादन करण्याची क्षमता चाऱ्यावर अवलंबून असते. अशा परिस्थितीत जनावरांचे दूध उत्पादन वाढवण्यासाठी त्यांना पोषक चारा देणे अत्यंत गरजेचे आहे. ही बाब लक्षात घेऊन भारतीय कृषी संशोधन परिषदेने (आयसीएआर) अननसाच्या पानांपासून पौष्टिक चारा बनवण्याची पद्धत सुचवली आहे, ज्यामुळे जनावरांचे दूध उत्पादन एक ते दीड किलोने वाढू शकते. विशेष म्हणजे हा चारा जनावरांच्या आरोग्यासाठी तर चांगला आहेच पण दुधाचे प्रमाण वाढवण्यासही उपयुक्त आहे.



जनावरांच्या चाऱ्यात अननसाच्या पानांचा वापर : भारतीय कृषी संशोधन परिषदेच्या म्हणण्यानुसार अननसाची पाने शास्त्रोक्त पद्धतीने जतन करून चारा बनवता येतो. या चाऱ्याला टोटल मिक्स्ड रेशन म्हणतात. या एकूण मिश्र रेशनमध्ये अनेक खाद्यपदार्थ एकत्र मिसळून जनावरांना खायला दिले जातात. टीएमआरमध्ये चाऱ्यासोबत संपूर्ण कापूस सरकी, धान्ये, प्रथिने, खनिजे आणि जीवनसत्त्वे मिसळून गायी आणि म्हशी दुभत्या जनावरांसाठी खाद्य तयार केले जातात. याप्रमाणेच अननसाच्या पानांचाही टीएमआर पशुखाद्य तयार करण्यासाठी वापर केला जाऊ शकतो. केरळमध्ये अननसाच्या पानांचा वापर जनावरांचा चारा बनवण्यासाठी केला जात आहे. केरळमध्ये अननसाची मोठ्या प्रमाणावर लागवड केली जाते. अशा परिस्थितीत जनावरांचा चारा बनवण्यासाठी त्याची पाने वापरली जात आहेत.

पौष्टिक चारा कसा बनवायचा : नुसार, सर्वप्रथम अननसाच्या पानांची वर्गवारी करावी. कापलेली किंवा खराब झालेली पाने त्यातून काढून टाकावीत. आता फक्त १०० किलो चांगली पाने घ्या आणि त्यात २ किलो गूळ मिसळा. या मिश्रणात अर्धा किलो मीठ देखील घालायचे आहे. आता हे संपूर्ण मिश्रण हवाबंद भांड्यात बंद करून ठेवावे. हा टीएमआर काही दिवसात तयार होईल. हा जनावरांसाठी अत्यंत सकस चारा असल्याचे सांगितले जाते.

जनावरांना चारा देण्याचे प्रमाण : अननसापासून तयार केलेला हा चारा जनावरांना एका दिवसात ५ ते १० किलो खाऊ घालू शकतो. त्याचे प्रमाण वाढवण्यासाठी त्यात अधिक गवत वगैरे घालता येईल. या टीएमआरमध्ये गवत, कोरडा चारा आणि धान्य मिसळून तुम्ही तुमच्या जनावरांना खाऊ शकता.

दुधाचे प्रमाण वाढण्याची शक्यता : अननसात व्हिटॅमिन सी मुबलक प्रमाणात असते. याशिवाय यामध्ये व्हिटॅमिन ए, बी ६, ई आणि के देखील असते. यामध्ये कॅल्शियम, फोलेट, लोह, मॅग्नेशियम, फॉस्फरस, पोटॅशियम आणि झिंक असते. त्यात पोषक तत्वे मुबलक प्रमाणात आढळतात. अशाप्रकारे, त्याच्या पानांमध्ये देखील भरपूर पोषक असतात जे प्राण्यांच्या आरोग्यासाठी चांगले असतात. अननसाची पाने चारा म्हणून दिल्यास जनावरांचे आरोग्य चांगले राहते आणि त्याची दूध देण्याची क्षमताही वाढते. अननसाच्या पानांचा चारा दिल्यास जनावरांचे दूध उत्पादन एक ते दीड लिटरने वाढू शकते, असे सांगितले जात आहे. त्याचबरोबर दुधातील फॅटचे प्रमाणही ०.३ ते ०.५ टक्क्यांनी वाढू शकते. एकंदरीत अननसाच्या पानांपासून बनवलेला चारा हा जनावरांसाठी उत्कृष्ट चारा ठरू शकतो.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१४३१: फ्रांसच्या रुआ शहरात जोन ऑफ आर्कला जाळून मृत्यूदंड.
१४९८: इटालियन सागरी खलासी कोलंबस आपल्या सहा जहाजांसोबत अमेरिकेच्या प्रवासाला निघाले.
१५५६: अकबराचा मुलगा सलीम व राणा प्रताप यांच्यामध्ये हळदीघाट येथे घनघोर लढाई झाली.
१५७४: हेन्री (तिसरा) फ्रान्सचा राजा बनला.
१६३५: प्रागचा तह.
१६३१: पहिले फ्रेंच वृत्तपत्र गॅझेट डी फ्रान्सचे प्रकाशन झाले.
१८१४: पॅरिसचा पहिला तह नेपोलियन बोनापार्टला एल्बा येथे हद्दपारीची शिक्षा.
१८६६: मुस्लीम धर्मीय विद्वान मुहम्मद क़ासिम नानोत्वी यांनी उत्तरप्रदेश मधील देवबंद या ठिकाणी आशिया खंडातील सर्वात मोठ्या समजल्या जाणाऱ्या मदरस्याची स्थापना केली.
१९२२: अमेरिकेतील वॉशिंगटन डीसी मध्ये लिंकन यांच्या स्मारकाचा जीर्णोद्धार करण्यात आला.
१९३४: मुंबई नभोवाणी केंद्राची सुरुवात.
१९४२: दुसरे महायुद्ध इंग्लंडच्या १००० विमानांनी जर्मनीतील कोलोन शहरावर तुफानी बॉम्बहल्ला केला.
१९७४: एअरबस ए-३०० विमानांची सेवा सुरू झाली.
१९७५: युरोपियन स्पेस एजंसीची स्थापना झाली.
१९८७: गोवा हे भारतातील २५ वे घटकराज्य मान्य करण्यात आले. गोव्याला भारतातील २६ वे घटक राज्य म्हणून मान्यता मिळाली. ३० मे १९८७ रोजी गोव्याला राज्याचा दर्जा देण्यात आल्याने ३० मे हा दिवस गोवा राज्य स्थापना दिन म्हणून साजरा केला जातो.
१९९३: पु. ल. देशपांडे यांना त्रिदल' संस्थेच्या वतीने पुण्यभूषण पुरस्कार प्रदान.
१९९८: अफगाणिस्तानमध्ये रिश्टर मापनपद्धतीनुसार ६.६ तीव्रतेचा भूकंप. ५,००० ठार.
२०१२: भारतीय बुद्धिबळपटू विश्वनाथन आनंद यांनी पाचव्यांदा विश्व बुद्धिबळ पटू होण्याचा मान पटकावला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१०१०: रेनझाँग, चिनी सम्राट.
१६७२: पीटर द ग्रेट, रशियाचा झार.
१८९४: डॉ. पांडुरंग सखाराम पिसुर्लेकर (इतिहासकार).
१८७९: कॉलिन ब्लाइथ, इंग्लिश क्रिकेट खेळाडू.
१८९५: मॉरिस टेट, इंग्लिश क्रिकेट खेळाडू.
१९०६: प्रसिद्ध भारतीय चित्रपट गीतकार, सर्वोत्कृष्ट पटकथा आणि कथा लेखक पंडित मुखराम शर्मा यांचा जन्मदिन.
१९०९: जॉर्ज हेडली (वेस्ट ईंडीझचे क्रिकेट खेळाडू).
१९१६: दीनानाथ दलाल (३० मे १९१६ १५ जानेवारी १९७१)दीनानाथ दलाल हे वाङ्मयीन पुस्तकांतील बोधचित्रांकरता, मुखपृष्ठांकरता ख्यातनाम झालेले मराठी चित्रकार होते. यांचे मूळ नाव नृसिंह दामोदर दलाल-नाईक होते परंतु पुढे दीनानाथ दलाल या नावाने ते प्रसिद्धीस आले.
१९४०: भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे माजी अध्यक्ष तसचं, बंगाल क्रिकेट असोसिएशन चे माजी अध्यक्ष आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेचे माजी अध्यक्ष जगमोहन दालमिया यांचा जन्मदिन.
१९४९: इंग्लिश जलदगती गोलंदाज बॉब विलीस यांचा जन्म.
१९५०: परेश रावल (भारतीय अभिनेते).
१९५२: भारतीय औषध शास्त्रज्ञ, संगीतशास्त्रज्ञ, हार्मोनियम वादक आणि ज्योतिषशास्त्र सल्लागार विद्याधर ओक यांचा जन्मदिन.
**१९५५:** प्रसिद्ध भारतीय हिंदी चित्रपट अभिनेते, विनोदकार आणि राजकारणी तसचं, भारतीय लोकसभेचे माजी सदस्य परेश रावल यांचा जन्मदिन.
१९५६: भारतीय वंशीय अमेरिकन जैविक अभियंता, साहित्य वैज्ञानिक आणि शैक्षणिक प्रशासक सुब्रा सुरेश यांचा जन्मदिन.
१९६४: भारतीय सेवानिवृत्त क्रिकेट पंच के. एन. राघवन यांचा जन्मदिन.
१९८०: देवेन्द्र बार्नहार्ट (अमेरिकन संगीतकार).

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८१४: नेपोलियन बोनापार्ट यांची पहिली पत्नी जोसेफिन डी बीअर्नार्नास यांचे निधन. (जन्म: २३ जून १७६३)
१८२९: विद्युत पृथक्करणाद्वारे सोडिअम आणि पोटॅशिअम ही मूलद्रव्ये प्रथमच वेगळी करणारे इंग्लिश भौतिक व रसायनशास्त्रज्ञ सर हंफ्रे डेव्ही यांचे निधन. (जन्म: १७ डिसेंबर १७७८)
१८९२: बहाई पंथाचे संस्थापक बहाउल्ला यांचे निधन. (जन्म: १२ नोव्हेंबर १८१७ तेहरान, इराण)
१९३३: भारतीय स्वातंत्र्य सेनानी, पत्रकार आणि संघटन कर्ता लोकराम नयनराम शर्मा यांचे निधन.
१९५४: व्हिक्टोरिया क्रॉस पुरस्कार प्राप्त ब्रिटीश सैन्य दलाचे थोर सैनिक फ्रेडरिक विल्यम हेजेस यांचे निधन.
१९७१: प्रख्यात भारतीय चित्रपट अभिनेते पृथ्वीराज कपूर यांचे निधन.
१९७२: पृथ्वीराज कपूर, हिंदी चित्रपटअभिनेता. (जन्म: ३ नोव्हेंबर १९०१)
१९७७: भाषाशास्त्रज्ञ सुनीतिकुमार चटर्जी यांचे निधन (भाषाशास्त्रज्ञ, साहित्य व संस्कृतीचे अध्यापक) (जन्म: २६ नोव्हेंबर १८९०)
१९८७: चौधरी चरण सिंग, लोकदलाचे संस्थापक, भारताचे ५ वे पंतप्रधान. (जन्म: २३ डिसेंबर १९०२)
२००७: महाराष्ट्र राज्य लता मंगेशकर पुरस्कार विजेते प्रसिद्ध भारतीय हिंदी व मराठी चित्रपट संगीतकार स्नेहल भटकर यांचे निधन. (जन्म: १७ जुलै १९१९)
२०१०: समाजवादी विचारवंत, स्वातंत्र्यसैनिक ग. प्र. प्रधान यांचे निधन. (जन्म: २६ ऑगस्ट १९२२)
२०२०: अजित जोगी (छत्तीसगढचे पहिले मुख्यमंत्री).



शनिवार दि.३० मे २०२६ ५

# राज्य लोकतंत्र मराठवाडा वृत्तांत




# गतीमान प्रशासनासाठी ई-ऑफिस प्रणालीसह आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा-सचिव खारगे

जालना। प्रतिनिधी

महसूल विभाग हा समाजासाठी काम करणारा महत्त्वाचा घटक असल्याने अधिकारी-कर्मचाऱ्यांनी आपली जबाबदारी ओळखुन काम करत, गतिमान प्रशासनासाठी ई-ऑफिस प्रणाली आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा असे आवाहन महसुल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी केले. येथील जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित महसुल विभागाच्या आढावा बैठकीत श्री. खारगे बोलत होते. यावेळी बैठकीस जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, जिल्हा पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू, अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, उपजिल्हाधिकारी मनिषा दांडगे, उपजिल्हाधिकारी मनिषा देशपांडे, सुकेशिनी पगारे, सह जिल्हा निबंधक रामेश्वर रोडगे, जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख एम. पी.



मगर, तहसिलदार छाया पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.


यावेळी अपर मुख्य सचिव श्री. खारगे पुढे म्हणाले की, नागरीकांना पारदर्शकपणे सेवा देण्यासाठी तसेच शासकीय कामकाजात गती आणुन कामाकाजातील प्रलंबितता कमी करण्यासाठी सर्व महसुल यंत्रणांनी ई-ऑफिस प्रणालीचा वापर करणे आवश्यक आहे. शासनाने ईज ऑफ डुइंग बिझनेसचे धोरण स्विकारले आहे. तसेच महसूल विभागातील अधिकाऱ्यांनी आठवड्यातून एक दिवस क्षेत्रीय दौरा करावा. यामुळे नागरिकांचे प्रश्न समजावून घेण्यास मदत होते. तसेच त्यांनी दिलेल्या निवेदनांवर सकारात्मक कारवाई करावी. तसेच विविध विकासकामांची प्रत्यक्ष पाहणी करुन, गुणवत्ता जाणून घेण्यास मदत होते. प्रशासनाने नागरिकामध्ये जावून काम करण्याचा प्रयत्न करावा. नागरिकांच्या समस्या, तक्रारींचा निपटारा करण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था निर्माण करुन त्यांच्या तक्रारींचा पाठपुरावा घ्यावा. कोणताही पाणंद रस्ता घेण्यापूर्वी तो अतिक्रमणमुक्त असावा, तसेच भूमी अभिलेख कार्यालयाकडून त्याचे सीमांकन करुन घ्यावे. पाणंद रस्त्यांच्या दर्जेदार कामांवर लक्ष ठेवण्याचे आणि पावसाळ्यापूर्वी जास्तीत-जास्त रस्ते पूर्ण करण्याचे नियोजन करावे.

तसेच शासकीय जमिनी अतिक्रमण विरहित कशा राहतील तसेच त्यांचे व्यवस्थापन कसे करता येईल याचे नियोजन करावे. शासकीय आणि खाजगी जागेची जबाबदारी महसुल विभागाकडे आहे. याकरीता सर्व सातबारा आणि मिळकत पत्रिका व्यवस्थित सुरक्षित ठेवाव्यात. तसेच नागरिकांना अनावश्यक त्रास होऊ नये, यासाठी सर्व अर्जांची वेळेत व पारदर्शक पद्धतीने पूर्तता करण्याचे आवाहन केले.

यावेळी अपर मुख्य सचिव श्री. खारगे यांनी त्यांनी जनगणना, छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान, शासकीय जमिनी वाटप व शर्तभंग प्रकरणे,पर्यायी वनीकरण,वन जमिनीचे ७/१२ अद्ययावत करणे, सिलिंग जमिन प्रकरणे, शेत व पाणंद रस्ते योजना, ई-पीक पाहणी, फेरफार नोंदी, वनहक्क दावे, अवैध गौण खनिज, घरकुलांना वाळू उपलब्ध करुन देणे आदी विषयांसह महसूल विषयक इतर कामांचाही आढावा घेतला. तसेच महसूल विभागातील प्रलंबित कामे, नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवा तसेच प्रशासकीय कामकाज अधिक कार्यक्षम करण्याच्या सूचना दिल्या. निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांनी सादरीकरणांद्वारे महसुल विभागातील विविध विषयांचा सविस्तर माहिती सादर केली. यावेळी बैठकीस जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, उपअधिक्षक भूमि अभिलेख, सह दूय्यम निबंधक यांची ऑनलाईन उपस्थिती होती.

## श्रीक्षेत्र ढालेगाव येथील दाधिच महाकुंभात उसळणार भक्तीचा महासागर

### सात दिवसीय दाधिच महाकुंभाचे आयोजन



मंठा। प्रतिनिधी

अखिल भारत वर्षीय दाहिमा (दाधिच) ब्राह्मण महासंघ अंतर्गत दाधिच महासभा महाराष्ट्र यांच्या वतीने परमपूज्य स्वामीजी गोविंद देव गिरीजी महाराज यांच्या प्रेरणेतून श्रीक्षेत्र ढालेगाव येथे ता. १ जून ते ७ जून असे सात दिवसीय दाधिच महाकुंभ २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. या महाकुंभात राज्यभरातून समाजाच्या भक्तीचा महासागर उसळणार आहे. महर्षी दाधिच नगरात आयोजित या सप्ताहामध्ये अनेक संत महंतांची उपस्थिती राहणार असून प. पु. समाधानजी महाराज यांच्या अमृतमय वाणीतून श्रीमद भागवत कथा संपन्न होणार आहे.

सोमवार तारीख १ जून रोजी दाधिच समाज महा कुंभाचे उद्घाटन होणार आहे. यावेळी समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सत्कार होणार असून दररोज विविध विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ८ वा. शोभायात्रा निघणार असून दैनंदिन कार्यक्रमांमध्ये दररोज सकाळी गायत्री हवन यज्ञ सकाळी ७ ते ८ : ३०, श्रीमद्? भागवत कथा सकाळी ९ : ३० ते १, सामाजिक कार्यक्रम व चर्चासत्र दुपारी ३ ते ६, आणि रात्री भजन संध्या असे भरगच्च कार्यक्रम पार पडणार आहेत. अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात होणाऱ्या या कार्यक्रमासाठी महाकुंभ आयोजन समिती, निवास व्यवस्था समिती, स्वागत समिती, प्रसाद वाटप समिती, सल्लागार समिती, प्रसिद्धी समिती, उद्योग व्यापार समिती, स्टेज तथा कथा हॉल समिती, तुलादान सेवा समिती, दाधिच प्रबोधन समिती, आरोग्य समिती, विवाह समन्वय समिती, श्रीमद्? भागवत संहिता पारायण समिती आदि समित्यांचे गठन करण्यात आलेले आहे. या दाधिच महाकुंभासाठी राज्यातून व परराज्यातून समाज बांधव व भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असून महाकुंभ आयोजन समिती दाधिच महासभा महाराष्ट्र यांच्यासह प्रदेश कार्यकारिणी, सर्व जिल्हाध्यक्ष व पदाधिकारी, युवा व युवती पदाधिकारी, महिला पदाधिकारी या धार्मिक सोहळ्यासाठी परिश्रम घेत आहेत.

## महसुलचे मुख्य सचिव विकास खारगे यांची विविध प्रकल्पास भेट व कार्यालयांची पाहणी

जालना। प्रतिनिधी

राज्याचे अपर मुख्य सचिव (महसूल) विकास खारगे हे आज (दि. २९ मे) जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले असता, त्यांनी आज विविध विकास प्रकल्प आणि शासकीय कार्यालयास प्रत्यक्ष भेट देवून कामांची पाहणी केली.

अपर मुख्य सचिव (महसूल) विकास खारगे यांच्या दौऱ्याची सुरुवात दरेगाव (ता. जालना) येथील ड्रायपोर्ट प्रकल्पाच्या पाहणीने झाली. या प्रकल्पाची सद्यस्थिती, उपलब्ध सुविधा तसेच भविष्यातील नियोजनाबाबत त्यांनी अधिकाऱ्यांकडून सविस्तर माहिती घेतली. प्रकल्पाच्या कामांमध्ये गती आणण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

त्यानंतर त्यांनी जालना शहरातील



मोतीबाग चौपाटी येथे सुरू असलेल्या सुशोभिकरण कामांची पाहणी केली. कामाची गुणवत्ता, प्रगती आणि नागरिकांसाठी निर्माण करण्यात येणाऱ्या सुविधांचा त्यांनी आढावा घेतला. शहर सौंदर्यीकरणाच्या कामांमध्ये दर्जा राखण्याबाबत त्यांनी संबंधित यंत्रणेला सूचना केल्या. यानंतर जालना येथील सिरसवाडी रोडवरील जिल्हा रेशीम कोष बाजारपेठेस भेट देऊन बाजारपेठेतील सुविधा आणि कार्यपद्धतीची माहिती घेतली. तसेच यावेळी त्यांनी उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, सह दुय्यम निबंधक कार्यालयास, उपविभागीय अधिकारी कार्यालय, जालना तहसिल कार्यालय, जालना, आपले सरकार सेवा केंद्र तहसिल कार्यालय, जालना येथे भेट देऊन येथील उपलब्ध सोयी सुविधांची पाहणी केली. तसेच संबंधीत कर्मचाऱ्यांशी संवाद साधुन नागरिकांना पुरविण्यात येणाऱ्या सेवांची देखील माहिती घेतली. तसेच त्यांनी बदनापुर येथील कृषी विज्ञान/संशोधन केंद्रास भेट दिली. कार्यालयीन कामकाज अधिक गतिमान, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख करण्याच्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

## स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची जयंती साजरी



जालना। प्रतिनिधी

जिल्हाधिकारी कार्यालयात आज स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची जयंती साजरी करण्यात आली. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील नायब तहसीलदार तुषार निकम, शिल्पा मगरे, ज्योती वाघ, अनिल शिंगाडे , राहूल देशपांडे, इंद्रजीत नानोटे, सुनील काळुंखे, नंदू उगले, सुनील बंड, प्रतिभा चव्हाण यांच्यासह इतर अधिकारी-कर्मचारी यांनीही स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करून पुष्प अर्पण केले.

## बनटाकळीचा पाझर तलाव दुरुस्ती करा: शेतकऱ्यांची मागणी

जालना। प्रतिनिधी

मौजे बनटाकळी ता. अंबड जि. जालना येथील पाझर तलाव मागील वर्षी अतिवृष्टीमुळे फुटला असून आजपर्यंत त्याची दुरुस्ती करण्यात आलेली नाही. सदर तलाव फुटल्यामुळे गावातील शेतकरी, नागरिक तसेच जनावरांच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. सदर पाझर तलाव हा गावासाठी अत्यंत महत्त्वाचा जलस्रोत असून तलावामध्ये पावसाचे पाणी साठल्याने परिसरातील विहिरी, बोअरवेल तसेच शेतीसाठी आवश्यक पाण्याची उपलब्धता होत असते. मात्र तलाव फुटलेल्या अवस्थेत असल्याने पाणी साठवण होत नसून भूजल पातळी मोठ्या प्रमाणात खालावण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

आगामी पावसाळा अगदी जवळ आलेला असून जर वेळेत दुरुस्ती झाली नाही तर यावर्षीही मोठ्या प्रमाणात



पावसाचे पाणी वाया जाणार आहे. यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होऊन भविष्यात तीव्र पाणीटंचाई निर्माण होण्याची भीती ग्रामस्थांमध्ये व्यक्त होत आहे.तसेच पावसावर अल निनोचा प्रभाव असल्याचे माननिय मुख्यमंत्री यांनी सांगितले आहे. पाझर तलाव दुरुस्त झाला नाही तर पावसाळ्यात पडलेले पाणी साचून न राहता ते वाहून जाईल याची भीती नागरिकात झाली आहे. याबाबतचे निवेदन देऊनसुद्धा अद्यापही कोणतीच कारवाई केलेली नाही त्यामुळे ग्रामस्थांमध्ये नाराजी पसरली आहे.तरी सदर बाबीची गांभीर्याने दखल घेऊन संबंधित विभागामार्फत तात्काळ पाहणी करून पावसाळ्यापूर्वी पाझर तलावाची दुरुस्ती करण्यासाठी निधी उपलब्ध करून काम सुरू करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी ग्रामस्थानी केली आहे.

## जमीन मोजणी प्रकरणात साळवे आणि पुसदकर निलंबन टाळण्यासाठी लाखोंची कमिशन डील ?

### भालगाव येथील पांडुरंग घुले शेतजमीनीत अतिक्रमण आणि मोजणी फेरफार प्रकरण

पाथर्डी । प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यातील भालगाव येथील पीडित शेतकरी पांडुरंग मायनजी घुले व त्यांचे दोन मुलं हरी पांडुरंग घुले वसंत पांडुरंग घुले या बंधूंच्या शेतजमीन गट नंबर ४२४ ४२५ व ३९१ शेतजमिनीत (वहिवाट आणि बांध सामनेवाले एकनाथ घुले यांच्यात शेतजमीनमोजणी वरून वाद आहे यासंदर्भात पाथर्डी भूमीअभिलेख कार्यालयातील तत्कालीन उपअधीक्षक निखिल मोरे दिनेश पुसदकर सुनील साळवे यांच्या भ्रष्ट कारभारामुळे वसंत घुले आणि हरी घुले यांच्या शेतजमिनीमध्ये एकनाथ घुले यांनी वहिवाटीत अतिक्रमण केले असल्याची तक्रार थेट महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केली होती त्याअनुषंगाने बनावट दस्तावेज तयार करून मोजणीत फेरफार केल्याप्रकरणी पाथर्डी भूमीअभिलेख कार्यालयातील तत्कालीन कर्मचारी निखिल मोरे व विद्यमान कर्मचारी दिनेश पुसदकर व सुनील सावळे यांचे निलंबन करण्याची मागणी होती त्या अनुषंगाने जिल्हा भूमीअभिलेख अधीक्षक संजय कुंभार यांनी चौकशी समिती नेमून चौकशी समितीचे प्रमुख संदीप गोसावी यांच्या समितीने मोरे साळवे आणि पुसदकर यांच्यावरील आरोप सिद्ध करून अहवाल पूर्ण केला आहे या अनुषंगाने सदरील प्रकरणातील आरोप सिद्ध झालेले कर्मचारी मोरे साळवे पुसदकर यांना नोटीस पाठवून खुलासा मागवला जाईल व अंतिम निलंबनाची कारवाई भुमिअभिलेख नाशिक अधीक्षक अभियंता महेश इंगळे हे करतील असे ठाम मत अहिल्यानगर भूमीअभिलेख अधीक्षक संजय कुंभार यांनी व्यक्त केले होते परंतु महिना उलटून गेला तरी अहिल्यानगर भूमीअभिलेख अधीक्षक संजय कुंभार हे साळवे आणि पुसतकर यांचे निलंबन का टाळत आहेत यावर त्यांचे सरकारी उत्तर थांबा आणि वाट पहा असे असून यामुळे भ्रष्ट कर्मचारी साळवे व पुसदकर यांचे निलंबन टाळण्यासाठी लाखोंची डील झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे या सदर्भात साळवे व पुसदकर यांचे निलंबन करण्याच्या मागणीसाठी पाथर्डी भूमीअभिलेख कार्यालय समोर आमरण उपोषण करण्यात येणार आहे.

पाथर्डी भूमीअभिलेख कार्यालयातील तत्कालीन उपाधीक्षक निखिल मोरे दिनेश पुसदकर व सुनील साळवे यांनी लाखो रुपयांची आर्थिक देवाणघेवाण करून संगनमताने भालगाव येथील शेतकरी पांडुरंग मायनजी घुले त्यांचे मुलं वसंत घुले व हरी घुले यांच्या शेतजमीन गटनंबर ३९१ ४२४ व ४२५ जमीन मोजणीमध्ये २०/१२/२०२४ २०/०६/२०२५ तारखेला केलेल्या हद्दीखुणा २०/३/२०२६ रोजी केलेल्या हद्दीखुणा गट नंबर ३९१ मध्ये कायम मोजणी सीट व पोटहिस्सा यामध्ये सुद्धा प्रचंड तफावत जाणवत असल्याचे सिद्ध झाले आहे तसा अहवाल पूर्ण केला आहे यामुळे मोरे पुसदकर व साळवे यांच्यावर निलंबन कारवाई अटळ आहे.

(संजय कुंभार-जिल्हाअधीक्षक भूमीअभिलेख कार्यालय अहिल्यानगर)

## राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जुनेद मिर्झा यांची नियुक्ती



जालना। प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांनी नुकतीच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या असंघटीत कामगार विभागाच्या जालना जिल्हाध्यक्षपदी जुनेद वहीद मिर्झा यांची नियुक्ती केली आहे . यावेळी जिल्ह्यात मोठ्या संख्येने असलेल्या असंघटीत कामगारांचे संघटन करून त्यांच्या माध्यमातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष जिल्ह्यामध्ये वाढीसाठी प्रयत्न करू असे जुनेद मिर्झा म्हणाले. तसेच जिल्ह्यातील असंघटित कामगार संघटीत करण्याच काम राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी असंघटित कामगार विभागाच्या वतीने मोठ्या प्रमाणात झाल पाहिजे अशी इच्छा जिल्हाध्यक्ष माजी आ.चव्हाण यांनी व्यक्त केली. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी असंघटीत कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न शील राहील असे ही जिल्हाध्यक्ष माजी आ.चव्हाण म्हणाले. या नियुक्ती प्रसंगी सुनील लाखे, आरेफ इब्राहीम सय्यद यांची उपस्थिती होती.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
शनिवार दि.३० मे २०२६


# जायकवाडीच्या पाण्यासाठी जलसंपदा मंत्र्यांच्या घरासमोर उपोषणाचा इशारा

## विराट बैलगाडी मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला, रखरखत्या उन्हात शेतकऱ्यांचा टाहो

बीड । प्रतिनिधी

येत्या दीड महिन्यात गोदावरी-सिंदफणा नदीजोड प्रकल्प व उपकालव्याचे सर्वेक्षण करा, १६८ टीएमसी मध्ये बीड जिल्ह्यातील शेतीला हक्काचे पाणी द्या यासह इतर मागण्या पूर्ण करा, अशी मागणी विराट बैलगाडी मोर्चातून रखरखत्या उन्हात आलेल्या शेतकर्यांनी केली. मागणीची पूर्तता नाही झाल्यास पायी दिंडी काढत जलसंप्दा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या घरासमोर उपोषण करण्याचा इशारा दिला.

यावेळी कालीदास दादा आपेट, सुशीलाताई मोराळे, भाऊसाहेब जरांगे पाटिल, समन्वयक दिनेश गुळवे, राहुल लोंढे, अप्पासाहेब महानोर, बाबुराव जेठे, अप्पासाहेब तळेकर, मोहन गुंड, कुलदिप करपे, संतोष भारती, बालासाहेब कोळेकर, राजाभाऊ महाराज कुटे, परमेश्वर वाघमोडे, देविदास वाणी, महादेव गायकवाड, संजय जाधव, ज्ञानेश्वर शेरकर, गोरक्ष परदेशी, शामराव घुगे, भास्कर मार्कड, पपू पवळ, महादेव रडे, जालिंदर रसाळ, बप्पासाहेब रत्नपारखे, अशोक काळे, लक्ष्मण नागरगोजे, सुधाकर नागरगोजे, रामेश्वर गाडे, काशीनाथ जोगदंड, राज सवासे, राजाराम निर्मळ,लक्ष्मण काशीद,भारत पवार, साई गावडे, बळीराम राक्षे, केशव जाधव, बालासाहेब शेरकर, गजानन कोळेकर,नवनाथ पवळ, वसंत पवळ, अजय गोयकर, गणेश हाडुळे आदींसह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. बीड जिल्ह्यातील बहुतांश शेती दुष्काळग्रस्त असल्याने शेतकऱ्यांसमोर अनेक प्रश्न आहेत हे प्रश्न सोडविण्यासाठी बीड जिल्ह्यातील शेतीला जायकवाडी धरणाचे पाणी मिळावे, गोदावरी व सिंदफणा नदी जोड प्रकल्प करून उपकालवा करावा, १६८ टीएमसी पाण्यात बीड जिल्ह्याला हक्काचे पाणी द्यावे या प्रमुख मागण्यासाठी लोकलढा आंदोलनाच्या वतीने शुक्रवारी सकाळी बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर विराट बैलगाडी मोर्चा काढला. राजमाता अहिल्यादेवी होळकर, महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विराट बैलगाडी मोर्चास सुरुवात झाली. शेतकऱ्यांचा लोकलढा, जायकवाडीचे पाणी सोडा, पाणी आमच्या हक्काचे, नाही कोणाच्या बापाचे अशा घोषणांनी बीड शहर दणाणून गेले. प्रचंड ऊन असतानाही शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने या मोर्चात सहभाग घेतला. येत्या दीड महिन्यामध्ये शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य न झाल्यास जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अहिल्यानगर येथील घरासमोर पायी दिंडी काढत उपोषण करण्याचा इशारा यावेळी लोकलढा आंदोलनाच्या समन्वयकांनी दिला. बीड जिल्ह्यातील शेतकरी पाण्याविना अतिशय संकटात असल्याने जिल्ह्यात नदीजोड प्रकल्प गतीने करण्याची मागणी यावेळी आंदोलकांनी केली. या मोर्चात इयत्ता सहाविची विद्यार्थीनी दिआ गुळवे हिने कविता सादर करीत शेतकऱ्यांच्या वेदना मांडत शेतीला पाणी देण्याची मागणी केली. या आंदोलनात जिल्हाभरातील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता.






### समन्यायी पाणीवाटप करा- सुशीलाताई मोराळे

संयुक्त महाराष्ट्र झाला तेव्हा विदर्भ अटीसह सहभागी झाला तर मराठवाडा विनाअट सहभागी झाला. मराठवाड्यावर अन्याय झाल्याने सामाजिक कार्यकर्ते यांनी आंदोलने केली, त्यानंतर जायकवाडी प्रकल्प, एमआयडीसी व इतर कामे झाली. मराठवाड्यात मात्र सिंचनाचा मोठा अनुशेष आहे, हा अनुशेष भरून काढा व समन्यायी पाणी वाटप करा अशी मागणी प्रा. सुशीलाताई मोराळे यांनी केली.

### पाणीप्रश्न संसदेत मांडावा-आपेट

बीड जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्या करीत असून याचे कारण सातत्याने शेती तोट्यात जाते हे आहे. शेतीला जायकवाडी धरणाचे हक्काचे पाणी मिळाल्यास शेतकऱ्यांचे जीवन विकसित होईल. त्यामुळे बीड जिल्ह्यातील सिंचनाचा प्रश्न खासदार बजरंग सोनवणे यांनी संसदेत मांडावा नसता त्यांच्या घरासमोर आंदोलन करण्याचा इशारा या मोर्चात कालिदास आपेट यांनी दिला.

### शेतकऱ्याच्या हस्ते ध्वजारोहण करू-गुंड

राज्य शासनाकडून मराठवाड्यातील शेतीचा पाण्याचा प्रश्न सोडविला जात नसल्याने मराठवाड्यावर अन्याय होत आहे. मराठवाड्यातील शेती पाण्याचे प्रश्न शासनाने गतीने सोडवावे, प्रकल्पाचे काम तात्काळ चालू करावे नसता येत्या मराठवाडा मुक्ती संग्राम दिन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना ध्वजारोहण करू न देता हे ध्वजारोहण शेतकऱ्यांच्या हस्ते करण्याचा इशारा या मोर्चात भाई मोहन गुंड यांनी दिला.

# पाटोद्यात आरोग्य व्यवस्थेचे तीन तेरा; सर्पदंशग्रस्ताचा मृत्यू

**रुग्णवाहिका व योग्य उपचार वेळेत न मिळाल्याने जावळे यांचा दुर्दैवी अंत**

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील जावळाला येथील मधुकर जावळे यांचा सर्पदंशामुळे दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना समोर आली असून, या घटनेमुळे तालुक्यातील ग्रामीण आरोग्य व्यवस्थेचा गंभीर प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. सर्पदंश झाल्यानंतर तातडीने उपचार मिळणे आवश्यक असताना रुग्णवाहिका वेळेत उपलब्ध न होणे, प्राथमिक उपचारात झालेला विलंब आणि ग्रामीण रुग्णालयातील अपुरी सुविधा यामुळे एका शेतकरी कुटुंबातील व्यक्तीचा जीव गेल्याचा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मधुकर जावळे यांना सर्पदंश झाल्यानंतर कुटुंबीयांनी तातडीने १०८ रुग्णवाहिकेशी संपर्क साधला. मात्र बराच वेळ रुग्णवाहिका उपलब्ध झाली नाही. रुग्णाची प्रकृती गंभीर होत असल्याने अखेर नातेवाईकांनी खासगी वाहनातून त्यांना पाटोदा ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र तेथेही योग्य उपचार व आवश्यक सुविधा उपलब्ध नसल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे. रुग्णाची प्रकृती अधिक खालावत गेल्याने डॉक्टरांनी पान ३ वर

# जिल्ह्यात चक्रीवादळाचा तडाखा

## चिंचवडगाव येथे शेतकऱ्याच्या सौर ऊर्जा पंपाचे मोठे नुकसान, तातडीने मदतीची मागणी

वडवणी । प्रतिनिधी

राज्यात हवामानात सातत्याने बदल होत असून, काल दिनांक २७ मे २०२६ मध्यरात्री बीड जिल्ह्यातील वडवणी परिसरात अचानक आलेल्या जोरदार चक्रीवादळाने आणि वादळी वाऱ्याने मोठी पडझड घडवून आणली आहे. या नैसर्गिक आपत्तीचा मोठा फटका मौजे चिंचवडगाव येथील एका शेतकऱ्याला बसला असून, त्यांच्या शेतातील सौर ऊर्जा पंपाचे अतोनात नुकसान झाले आहे.



चिंचवडगाव ता. वडवणी येथील रहिवासी आणि प्रगतशील शेतकरी श्री. सुधाकर विनायक आंधळे यांच्या शेतामध्ये 'सीआरआय' (CRI) कंपनीचा सौर ऊर्जा पंप बसवण्यात आलेला होता. हा पंप त्यांच्या शेतीच्या सिंचनाचा मुख्य आधार होता. मात्र, काल दुपारच्या सुमारास परिसरात अचानक वादळी वाऱ्यासह भीषण चक्रीवादळ धडकले. या वादळाचा वेग इतका प्रचंड होता की, शेतातील सौर ऊर्जा पंपाचे पॅनेल्स आणि संपूर्ण यंत्रणा उखडून फेकली गेली, ज्यामुळे पंपाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

शेतकऱ्यासमोर आर्थिक संकट

या अचानक आलेल्या नैसर्गिक संकटामुळे शेतकरी सुधाकर आंधळे यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. सद्यस्थितीत शेतीची कामे अंतिम टप्प्यात असतानाच पाण्याचा मुख्य स्त्रोत असलेला सौर पंप निकामी झाल्यामुळे त्यांच्या शेतीकामांवर आणि पिकांच्या सिंचनावर याचा विपरीत परिणाम झाला आहे हा सौर पंप माझ्या शेतीचा मुख्य आधार होता. वादळामुळे याचे संपूर्ण नुकसान झाले असून आता पिकांना पाणी कसे द्यावे, असा प्रश्न माझ्यासमोर उभा राहिला आहे. कंपनीने आणि प्रशासनाने माझी अडचण समजून घेऊन त्वरित मदत करावी.

श्री. सुधाकर विनायक आंधळे (बाधित शेतकरी)

'सीआरआय' कंपनी आणि प्रशासनाकडे मागणी

या घटनेनंतर पीडित शेतकऱ्याने आणि ग्रामस्थांनी संबंधित पान ३ वर

# खासदार श्रीकांत शिंदेंच्या दौऱ्यात पाटोद्यात काळे झेंडे



पाटोदा । प्रतिनिधी

शिवसेना शिंदे गटाचे नेते व खासदार श्रीकांत शिंदे यांच्या बीड जिल्हा दौऱ्यादरम्यान पाटोदा शहरात राजकीय वातावरण चांगलेच तापल्याचे पाहायला मिळाले. केज तालुक्यातील 'शिवसंवाद' बैठकीनंतर खासदार श्रीकांत शिंदे यांचा ताफा पाटोद्यात दाखल होताच ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी काळे झेंडे दाखवत जोरदार घोषणाबाजी केली. या अचानक झालेल्या आंदोलनामुळे काही काळ परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

### ठाकरे गटाची जोरदार घोषणाबाजी

वाढत्या पेट्रोल-डिझेल दरवाढीचा निषेध व्यक्त करण्यासाठी काळे झेंडे दाखवण्यात आल्याचे आंदोलकांनी सांगितले. खासदार श्रीकांत शिंदे यांच्या ताफ्यासमोर येत ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी सरकारविरोधी घोषणाबाजी केली. यावेळी मंत्री भरतशेठ गोगावले, खासदार संदिपान भुमरे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

दरम्यान, पाटोदा शहरात लावण्यात आलेल्या स्वागत बॅनरवर स्थानिक पान ३ वर

# गेवराई पोलीस ठाण्याकडून अवैध वाळू वाहतुकीवर धडक कारवाई: ८ लाख ६ हजारांचा मुद्देमाल जप्त



गेवराई । प्रतिनिधी

बीड जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांनी जिल्ह्यातील अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी आणि विशेषतः गेवराई तालुक्यात चालणाऱ्या अवैध वाळू उत्खनन व वाहतुकीवर कडक कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. या आदेशान्वये गेवराई पोलिसांनी धडक मोहीम हाती घेतली असून, अवैध वाळू वाहतूक करणारा एक ट्रॅक्टर आणि १ ब्रास वाळूसह एकूण ८ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

**हिंगणगाव परिसरात पोलिसांची कारवाई:**

पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक श्री. समीर शेख, आणि गेवराईचे उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली गेवराई पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक किशोर पवार यांनी वाळू माफियांविरुद्ध कारवाईचे विशेष नियोजन केले होते. दिनांक २९.०५.२०२६ रोजी सकाळी ७:३० वाजताच्या सुमारास गेवराई पोलीस पथक हिंगणगाव परिसरात पेट्रोलिंग करत होते. यावेळी हिंगणगावकडून पाथरवाला गावाकडे जाणारा एक महिंद्रा अर्जुन ५५५ कंपनीचा ट्रॅक्टर पोलिसांना आढळून आला. पोलिसांचे वाहन पाहताच ट्रॅक्टर चालकाने पोलीस पथकाला पाहून घटनास्थळावरून पळ काढला.

८ लाख ६ हजारांचा मुद्देमाल जप्त व गुन्हा दाखल:

पोलिसांनी संशयास्पद ट्रॅक्टरची तपासणी केली असता, त्यात विनापरवाना अवैध वाळू आढळून आली. पोलिसांनी चेसीस क्र. ०१४४९ व इंजिन क्र. २०००२ असलेला महिंद्रा ट्रॅक्टर, जुनी वापरती विनरंगाची ट्रॉली आणि १ ब्रास पान ३ वर





# सर्वांच्या सहकाऱ्याने यशस्वीपण काम केले-बेबीसरोज अंबिलवादे

बीड । प्रतिनिधी

बीडमध्ये सर्व सहकारी आणि पत्रकारांचे काम करताना मोठे सहकार्य लाभले. सर्वांच्या सहकार्याने माझे नोकरीतील आयुष्य यशस्वीपणे गेले. त्या सर्वांचे या सेवानिवृत्ती प्रसंगी मी आभार मानते, यापुढेही असाच स्नेह राहूद्या असे प्रतिपादन जिल्हा माहिती कार्यालयाच्या वरिष्ठ लिपिक श्रीमती बेबीसरोज अंबिलवादे यांनी सेवानिवृत्ती कार्यक्रमात केले. यावेळी जिल्हा माहिती कार्यालयाच्या वरिष्ठ लिपिक श्रीमती बेबीसरोज गजानन आंबीलवादे यांच्या सेवानिवृत्ती सत्कार कार्यक्रम प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान जेष्ठ संपादक सर्वोत्तम गावरस्कर, प्रमुख पाहुणे म्हणून लोकप्रश्नचे संपादक दिलीप खिस्ती,सकाळचे जिल्हा प्रतिनिधी दत्ता देशमुख, मराठवाडा साथीचे जिल्हा प्रतिनिधी एड. संदीप बेद्रे यांच्यासह पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी आभार डॉ. मनीषा अंबिलवाले यांनी मानले.

# माजलगाव धरण कमानीसमोर रातोरात अहिल्यादेवींचा पुतळा



**शहर पोलीस ठाण्यात अज्ञात १० ते १२ जणांविरुद्ध गुन्हा**

**पुतळा क्रेनच्या सहाय्याने तो लोखंडी स्टँडवर दोरीच्या मदतीने बसविल्याची माहिती**

माजलगाव । प्रतिनिधी

शहराजवळील धरण कमानीसमोर दि २८ मे गुरुवार रोजी अहिल्यादेवी होळकर यांचा पुतळा रातोरात बसविण्यात आल्याची घटना समोर आली असून,याप्रकरणी अज्ञात १० ते १२ जणांविरुद्ध माजलगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

माजलगाव शहराबाहेरील गढी रोडवरील माजलगाव धरण कमानीसमोर यापूर्वी अहिल्यादेवी होळकर चौक स्थापन करण्यात आला होता. दरम्यान,दिनांक २८ रोजी पहाटे ३:०० ते ४:०० वाजण्याच्या सुमारास काही अज्ञात व्यक्तींनी टेम्पोमधून अहिल्यादेवी होळकर यांचा पुतळा आणून क्रेनच्या सहाय्याने तो तात्पुरत्या लोखंडी स्टँडवर दोरीच्या मदतीने बसविल्याची माहिती समोर आली आहे.याबाबत जायकवाडी प्रकल्प क्रमांक २ च्या सहाय्यक अभियंता शितल माने यांनी माजलगाव शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिली.सदर तक्रारीत माजलगाव धरण परिसरातील जागेचे विद्रुपीकरण करून वाहतुकीस अडथळा निर्माण केल्याचा आरोप करत

रहदारीच्या मार्गावर धोकादायक पद्धतीने पुतळा उभारून नागरिकांच्या जीवितास व पान ३ वर

# दुष्काळी आष्टी-पाटोदा-शिरूरच्या पाणीप्रश्नासाठी धोंडे-आजबे मैदानात

## समुद्रात वाहून जाणाऱ्या २०० टीएमसी पाण्यावर अवर्षणग्रस्त भागाचा हक्क; २० टीएमसी पाणी देण्याची जोरदार मागणी

### नाशिक येथे नदीजोड प्रकल्प समन्वय कक्षाच्या मुख्य अभियंत्यांना निवेदन; राष्ट्रवादी काँग्रेस पदाधिकारी, महेश कारखान्याचे संचालक उपस्थित

आष्टी । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील कायमस्वरूपी दुष्काळी पट्टा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आष्टी, पाटोदा आणि शिरूर (का.) तालुक्यांच्या पाणीप्रश्नाला आता पुन्हा एकदा राजकीय धार मिळू लागली आहे. अनेक वर्षांपासून पिण्याचे पाणी, शेतीसाठी सिंचन आणि भूजल पातळी घटण्याच्या गंभीर समस्यांनी त्रस्त असलेल्या या भागासाठी समुद्रात व्यर्थ वाहून जाणारे पाणी वळविण्याची मागणी माजी आमदार भीमराव धोंडे आणि माजी आमदार बाळासाहेब आजबे यांनी जोरदारपणे पुढे रेटली आहे.

या संदर्भात माजी आ. धोंडे व माजी आ. आजबे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने नाशिक येथे मुख्य अभियंता (नदीजोड प्रकल्प समन्वय कक्ष) प्रकाश मिसाळ यांची भेट घेत सविस्तर चर्चा केली. यावेळी लेखी निवेदन सादर करत समुद्रात वाहून जाणाऱ्या जवळपास २०० टीएमसी अतिरिक्त पाण्यापैकी किमान २० टीएमसी पाणी आष्टी, पाटोदा आणि शिरूर तालुक्यासाठी राखीव ठेवण्याची ठाम मागणी करण्यात आली.

दुष्काळाचा कायमचा शाप; जनतेचा संताप

आष्टी-पाटोदा-शिरूर हा पट्टा दरवर्षी पाणीटंचाईच्या झळा सहन करत आहे. अनेक गावांमध्ये उन्हाळ्यात टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागतो. शेतकऱ्यांची पिके कोमेजत असून, पाण्याअभावी शेतीचे क्षेत्र कमी होत आहे. रोजगाराच्या शोधात युवकांचे स्थलांतर वाढत आहे. अशा परिस्थितीत या भागातील जनतेमध्ये शासनाविषयी नाराजी वाढत असून, आता कायमस्वरूपी जलआराखड्याची मागणी तीव्र झाली आहे.

माजी आ. भीमराव धोंडे यांनी यावेळी बोलताना, मराठवाड्याच्या हक्काचे पाणी समुद्रात वाहून जाणे ही शोकांतिका आहे. शासनाने इच्छाशक्ती दाखवली तर नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून हा भाग हिरवागार होऊ शकतो. केवळ आश्वासने नकोत, तर प्रत्यक्षात निर्णय झाला पाहिजे, असे स्पष्ट मत व्यक्त केले.

तर माजी आ. बाळासाहेब आजबे यांनी, आष्टी-पाटोदा-शिरूरच्या जनतेचा पाणीप्रश्न हा केवळ राजकारणाचा विषय नसून अस्तित्वाचा प्रश्न आहे. शेती, उद्योग, रोजगार आणि ग्रामीण अर्थव्यवस्था वाचवायची असेल तर पाणी द्यावेच लागेल, असे ठामपणे सांगितले.

राजकीय समीकरणांनाही मिळणार वेग

या भेटीमुळे स्थानिक राजकारणातही चर्चांना उधाण आले आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका आणि ग्रामीण भागातील राजकीय समीकरणांच्या पार्श्वभूमीवर पाणीप्रश्न पुन्हा एकदा केंद्रस्थानी येण्याची चिन्हे दिसत आहेत. दुष्काळी भागातील नागरिकांमध्ये पाणीप्रश्नावर प्रभावी आवाज उठवणाऱ्या नेतृत्वाकडे अपेक्षेने पाहिले जात असून, धोंडे-आजबे यांच्या या पुढाकारामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या ग्रामीण संघटनांनाही नवसंजीवनी मिळण्याची चर्चा सुरू आहे.

नदीजोड प्रकल्पातून मोठ्या बदलाची अपेक्षा

शिष्टमंडळाने नदीजोड प्रकल्पाचा सखोल अभ्यास करून मराठवाड्यातील दुष्काळी पान ३ वर





This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26